रायगड, बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## टी-२० विश्वचषकाचे बिगुल वाजले

**नवी दिल्ली :** आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ चे वेळापत्रक जाहीर झाले आहे. भारत आणि श्रीलंकेत ७ फेब्रुवारी ते ८ मार्च २०२६ दरम्यान खेळवल्या जाणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत एकूण २० संघ विजेतेपदासाठी झुंजताना दिसतील. या संघांची चार वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागणी करण्यात आली आहे. एकूण ५५ सामने खेळले जाणार आहेत. ७ फेब्रुवारी रोजी पहिला सामना पाकिस्तान आणि नेदरलँडमध्ये सकाळी ११ वाजता कोलंबो येथे, दुसरा सामना वेस्ट इंडिज आणि बांगलादेश संघात दुपारी ३ वाजता कोलकाता येथे आणि तिसरा सामना भारत आणि युएईमध्ये सायंकाळी ७ वाजता मुंबई येथे रंगणार आहे.

## फाईब्रो कास्ट कंपनीला भीषण आग

**पनवेल :** तळोजा एमआयडीसीमधील 'फाईब्रो कास्ट' या कंपनीला सकाळी अचानक भीषण आग लागून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या तीव्रतेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच तळोजा एमआयडीसी अग्निशामक दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत अनेक फायर टँकर्सच्या सहाय्याने आग नियंत्रणात आणली. तसेच आगीतून पसरणारा धूर आणि ज्वाळा रोखण्यासाठी अतिरिक्त दलाची मदतही पान ५ वर






# समुद्र सुरक्षित, रक्षक उपेक्षित

## चार महिन्यांचे मानधन थकले

| प्रमोद जाधव |
| रायगड |

**सागरी दहशतवादी हल्ल्यानंतर सागरी किनारे अधिक मजबूत करण्यासाठी मत्स्य विभागामार्फत खासगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली. किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्याचे काम ही यंत्रणा करीत असते. परंतु, याच सुरक्षा रक्षकांचे मानधन वेळेवर मिळत नसल्याचा प्रश्न कायमच चर्चेत आहे. जिल्ह्यातील ६८ हून अधिक सुरक्षा रक्षकांचे चार महिन्यांचे मानधन रखडले आहे. त्यामुळे त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. समुद्रकिनाऱ्याच्या सुरक्षेसाठी, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि आपत्कालीन प्रसंगी धावून जाण्यासाठी हेच कर्मचारी सर्वात पहिले पुढे येतात. त्यांच्यावरच उपासमारीची वेळ आली असून, सरकारच्या या धोरणाबाबत त्यांच्या कुटुंबियांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.**

स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभागांकडून तात्काळ दखल घेतली जात नसल्याने या कर्मचाऱ्यांच्या घरातील आर्थिक अडचणीही वाढत चालल्या आहेत. समुद्रकिनारी सुरक्षा व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी हे रक्षक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात; परंतु त्यांच्याच हक्काच्या मानधनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे

मुंबईमधील दहशतवादी हल्ले समुद्रमार्गे झाले आहेत. देशविघातक कारवाया रोखण्यासाठी, किनाऱ्यावरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी गृह विभागासह वेगवेगळ्या यंत्रणेने पावले उचलली आहेत. त्यामध्ये किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी मत्स्य विभागामार्फत सुरक्षा रक्षक नेमण्यास सुरुवात करण्यात आली. संपूर्ण राज्यात ६०० हून अधिक सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली. रायगड जिल्ह्यात ६८ जणांची निवड करण्यात आली. त्यात पाच सुपर वायझर व ६३ सुरक्षा रक्षकांचा समावेश आहे.



> **किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्याबरोबरच बोटींना टोकन देणे, त्यांची नोंदणी ठेवण्याचे काम केले जाते. जुलैपासून मानधन मिळालेले नाही. त्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे. कर्जाचे हप्ते थकले आहेत. कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे तातडीने मत्स्य विभागाने मानधन द्यावे, अशी मागणी आहे.**
> **- सुरक्षा रक्षक, नाव न सांगण्याच्या अटीवरून**

रायगड जिल्हा मुंबईच्या अगदी जवळ असल्याने समुद्रमार्गे दहशतवादी हल्ले होण्याचा धोका नाकारता येत नाही. रायगड जिल्ह्यात १९९३ मध्ये श्रीवर्धनमधील शेखाडी येथील सागरी किनारी आरडीएक्स सापडले होते. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धनमध्ये समुद्रमार्गे पान ५ वर

# सागरी सुरक्षेवर 'इगल'ची नजर



- **सागरी सुरक्षेसाठी ठरतेय वरदान**
- **रायगड पोलिसांचा अनोखा उपक्रम**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

सागरी मार्गाने होणारे दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी 'इगल आय ॲप' नावाचा एक नवा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील बोटींसह मालक, खलाशी व तांडेल यांची माहिती एका क्लिकवर मिळत आहे. सागरी सुरक्षा विभागामार्फत हा उपक्रम राबविण्यात आला असून, हा ॲप सागरी सुरक्षेसाठी वरदान ठरत आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किलो मीटरचा पान ५ वर

> सागरी मार्गाने होणाऱ्या गैरप्रकारासह दहशतवादी हल्ल्याला रोखण्यासाठी ईगल आय ॲप सुरू करण्यात आला. जिल्ह्यातील बोटींना क्यू आर कोड देण्यात आला आहे. एका क्लिकवर बोटींची माहिती सहज उपलब्ध होत आहे. सागरी सुरक्षा मजबूत ठेवण्यासाठी हा ॲप फायदेशीर ठरत आहे. - युवराज म्हसकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागरी सुरक्षा शाखा, रायगड पोलीस

## वेधक

### निर्मला गावित यांचा अपघात

**नाशिक :** आरडी सर्कल परिसरात घराबाहेर नातवांसोबत फेरफटका मारत असताना इगतपुरीच्या माजी आमदार निर्मला गावित यांना अज्ञात चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. ही घटना सोमवारी (दि.२४) सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या असून, तातडीने उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी अज्ञात चालकाविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नक्की हा अपघात होता की घातपात करण्याचा डाव, याबाबत पोलीस तपास सुरू आहे.



### तब्बल ११ लाख दुबार मतदार

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने २० नोव्हेंबर रोजी प्रारुप मतदार यादी जाहीर केली. मात्र, या यादीत अनेक घोळ असल्याचं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेने समोर आणलं आहे. यासाठी शिवसेना, मनसेसह विरोधी पक्षातील नेत्यांनी आयोगाकडे तक्रार ही दाखल केली आहे. नवीन प्रारुप मतदार यादीत तब्बल ११ लाख दुबार मतदार असल्याचं समोर आलं आहे. याबाबत आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. तसेच मतदार यादीतील घोळ दुरुस्त करण्याची मागणी केली.

### गृह, वाहन कर्ज होणार स्वस्त?

**नवी दिल्ली :** नव्याने कर्ज घेणाऱ्या किंवा घर, वाहन खरेदी करणाऱ्या किंवा वैयक्तिक कर्जाचे हप्ते सुरू असलेल्या सामान्य नागरिकांचे ईएमआय कमी होण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँक या वर्षाच्या अखेरीस रेपो रेटमध्ये आणखी एक कपात करण्याची शक्यता आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी रेपो रेटबाबत संकेत दिले आहेत. पुढील महिन्यात ३ ते ५ डिसेंबरदरम्यान आरबीआयच्या पत धोरण समितीची बैठक होणार आहे. या बैठकीत रेपो रेट कपातीसाठी अंतिम निर्णय घेण्यात येईल. ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीतच दरांमध्ये कपातीचे संकेत देण्यात आले होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत

# शुक्रवारी 'सर्वोच्च' फैसला

- **नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद निवडणुका लांबणीवर?**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. पण, या निवडणुकीत काही ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर मंगळवारी न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडणार होती. मात्र, ती सुनावणी आता लांबवणीवर पडली असून, शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी १२ वाजता होणार असल्याचे न्यायालयाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे सगळ्याच राजकीय पक्षांची धाकधूक वाढली आहे. न्यायालयाने आरक्षणाबाबत नवे आदेश दिले तर, स्थानिक स्वराजय संस्थेच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

आज झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडून बाजू मांडण्यात आली. बांठिया आयोगाच्या आधीच्या परिस्थिती ओबीसी आरक्षण नव्हतं. तेव्हाचा कायदा म्हणजेच खानविलकरांच्या खंडपीठाने दिलेले निकालपत्र ज्यात आरक्षण नव्हतं, असं याचिकाकर्त्यांकडून सांगण्यात आलं. त्यावर पान ५ वर



**आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या संस्था**

| | |
|---|---|
| नंदुरबार | १०० टक्के |
| पालघर | ९३ टक्के |
| गडचिरोली | ७८ टक्के |
| नाशिक | ७ टक्के |

### मतदारांनी निर्भीडपणे मतदान करावे

**संजय दराडे यांचे आवाहन**

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्थेचा आणि निवडणूक तयारीचा सखोल आढावा कोकण परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी घेतला. रायगड जिल्ह्यात नगरपंचायत व नगर परिषद निवडणूक प्रचार प्रसार जोरात सुरु आहे, अनेक ठिकाणी पोलीस पथसंचलन करून जनजागृती व सुरक्षा व्यवस्था याबाबत माहिती दिली जात आहे.



महाड, माणगाव, नागोठणे, पेण आणि कर्जत या प्रमुख ठिकाणी भेट देत त्यांनी पान ५ वर

# मनुस्मृती जिवंत असल्याचा भास होतोय : उल्का महाजन

| पोलादपूर | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेच्या राज्यामागे संत परंपरेचा विचार आहे, तोच विचार भारताच्या संविधानामध्येदेखील आहे, त्यामुळे जगातील सर्वोत्कृष्ट लोकशाही भारतामध्ये नांदत असताना ज्या क्रांती भूमीतून आपण संविधान अमृत महोत्सवाचा उपक्रम राबवित असलो, तरी अद्याप सर्वत्र मनुस्मृती जिवंत असल्याचा भास होत आहे, असे उद्गार सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी संविधान अमृत महोत्सवाच्या पूर्वसंध्येला क्रांतीभूमी येथील प्रमुख भाषणामध्ये व्यक्त केले.

याप्रसंगी व्यासपीठावर कॉम्रेड धनाजी गुरव, क्रांतीसिंह नाना पाटील यांचे चिरंजीव सुभाष पाटील, भारत महाराज कैकाडी, फडतरे महाराज, कैलास देसाई, पनवेल काँग्रेसच्या श्रुती म्हात्रे, जिल्हा काँग्रेस सदस्य धनंजय शिंदे, नागेश जाधव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

उल्काताई महाजन यांनी भाषणामध्ये पुढे पान ५ वर


(छायाचित्र : शैलेश पालकर)

- **संविधान अमृत महोत्सवाच्या पूर्वसंध्येला कार्यक्रम**
- **महाडच्या क्रांती भूमीतून नवोदयाची दिली हाक**

# २६/११ला १७ वर्षे पूर्ण

| मुंबई | प्रतिनिधी |

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरावर २६ नोव्हेंबर २००८ ला झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज १७ वर्षे पूर्ण होत आहेत. दि. २६ ते २८ नोव्हेंबरदरम्यान चाललेल्या या हल्ल्यात १६६ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ३४ हून अधिक परदेशी नागरिकांचाही समावेश होता. मुंबई शहरावर हल्ला करणाऱ्या दहा दहशतवाद्यांपैकी नऊ जणांचा चकमकीत खात्मा करण्यात आला. अजमल कसाब या दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात यश आले. मुंबई पोलीस दलातील हवालदार तुकाराम ओंबळे यांनी २६ नोव्हेंबरच्या रात्री आपल्या छातीवर गोळ्या झेलून कसाबला जिवंत पकडले होते.

२६ नोव्हेंबरच्या रात्री दहशतवाद्यांनी दक्षिण मुंबई येथे छत्रपति शिवाजी टर्मिनस, हॉटेल ताज महाल पॅलेस अँड टॉवर, हॉटेल ओबेरॉय ट्रायडेंट, लियोपोल्ड कॅफे, कामा हॉस्पिटल, नरीमन हाउस, मेट्रो सिनेमा, आणि टाइम्स ऑफ इंडिया इमारतीच्या मागील एक गल्ली या ठिकाणी झाले. या सर्व ठिकाणी दहशतवाद्यांनी लोकांवर अंदाधुंद गोळीबार केला व हातबॉम्ब फेकले. याव्यतिरिक्त माझगाव डॉक येथे एक बॉम्बस्फोट व विलेपार्ले येथे एका टॅक्सीमध्ये स्फोट घडवून आणण्यात आला होता.

एकमेव जिवंत पकडल्या गेलेल्या दहशतवादी अजमल कसाबची कसून चौकशीअंती फासावर चढवण्यात आले.



### कमळाला मतदान करु नका : जानकर

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील जत नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते व माजी मंत्री महादेव जानकर यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. मी त्यांच्या छावणीत राहून आलो आहे. मला त्यांची नियत आणि नीती मला चांगलीच माहिती आहे. आरक्षणाचे गाजर तुम्हाला दाखवलं जाईल. पण ते दिलं जाणार नाही. चार रस्ते केले म्हणजे झालं नाही. समाजात भांडण झाली तुमच्या भागीदारापासून बाजूला करण्याचे पाप भाजपने केले आहे. माझी हात जोडून विनंती आहे, तुम्ही कोणालाही मतदान करा. पण आई शप्पथ सांगतो, कमळाला मतदान करू नका, असे विधान महादेव जानकर यांनी केले आहे.




**राज्य शासनाचा मच्छिमारांना इशारा | मत्स्यसाठ्याच्या संवर्धनासाठी निर्णय**

# लहान मासे पकडल्यास थेट कारवाई

| रायगड | प्रतिनिधी |

बेसुमार मासेमारीमुळे माशांच्या विविध प्रजाती दुर्मिळ होत चालल्या असून, त्यामुळे लहान माशांना वाचवण्यासाठी शासनाने माशांचे आकार निश्चित केले आहेत. त्यामुळे आता मोठेच मासे विक्रीला असण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे अधिक पैसेही मोजावे लागतील. लहान मासे पकडल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

अनेकदा मासे लहान असतानाच पकडले जातात. त्याचा परिणाम माशांच्या प्रजोत्पादनावर होतो. लहान मासे पकडल्यामुळे पुढील वर्षी माशांचे प्रमाण कमी होते. पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांच्या हिताचे संरक्षण करणे, मत्स्यसाठ्याचे संवर्धन करणे अशा हेतूने लहान मासे पकडण्यावर शासनाने बंदी घातली आहे. त्यासाठी ५४ प्रजातींच्या माशांचे आकारमान ठरविण्यात आले. माशांची पिल्ले पकडल्यास घाऊक विक्रेत्यांना ५० हजार ते ५ लाख, तर किरकोळ विक्रेत्यांना माशांच्या किमतीच्या पाच पट दंड भरावा लागणार आहे. पान ५ वर



### मच्छिमार नाराज

मच्छिमारांवर एकतर्फी कारवाई करणे अन्यायकारक असल्याचे मत मच्छिमारांनी व्यक्त केले आहे. खोल समुद्रात मासेमारी करताना जाळ्यात चुकून काही वेळा माशांची पिल्ले अडकतात. त्यामुळे मासेमारीत ३० टक्क्यांपेक्षा जास्त पिल्ले सापडली, तरच संबंधितांवर कारवाई करावी. तसेच, पिल्लांची विक्री व खरेदी करणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी मच्छिमारांनी केली आहे.

### कोणता मासा किती आकाराचा?

ठिपकेदर कोळंबी (कापशी) ११० मिमी, ब्ल्यू क्रॅब (नील खेकडा) ९० मिमी, वाळूतील लॉबस्टर (फटफटी) १५० मिमी, ग्रे शार्पनोज शार्क (मुशी) ५३० मिमी, काळा पापलेट (हलवा) १७० मिमी, स्पॉटेड सिर (सुरमई) ३७० मिमी आदी विविध प्रजातींच्या माशांचे आकारमान निश्चित करण्यात आले.

# आपटा येथे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

| आपटा | प्रतिनिधी |

आपटा येथील मराठी जिल्हा परिषद शाळेमध्ये सोमवर, दि. २४ नोव्हेंबर रोजी गरीब गरजू मुलांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या वह्या वाशिवली तळवली येथील बिर्ला कार्बन कंपनीच्या सीआरएस फंडातून त्यांचे अधिकारी लक्ष्मण मोरे यांच्या पुढाकारातून वाटण्यात आल्या.

आपटा येथील पत्रकार बी.एस. कुलकर्णी, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक हसुराम पाटील व इरफान सर यांच्या हस्ते या वह्यांचे वाटप करण्यात आले. बिर्ला कार्बन कंपनी या भागामध्ये विविध शाळांमध्ये शालेय वस्तूंचे वाटप करत असते. त्याबद्दल शाळेच्या वतीने तळवली येथील बिर्ला कार्बन कंपनीचे अधिकारी लक्ष्मण मोरे यांचे शाळेच्यावतीने आभार मानण्यात आले.

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.२५२/२०२५**

पुष्पा मारुती म्हसकर
रा.रिळे ता. माणगाव जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
रिळे, ग्रामपंचायत देगाव
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. रुक्मिणी महादू म्हसकर यांचा जन्म/मृत्यू मौजे रिळे ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१९-०७-१९७४ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २८-०७-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू रिळे येथे दि. १९-०७-१९७४ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे ? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.१९-०७-१९७४ रोजी रिळे ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- २५-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत त्या विद्यमान मालक १) अजीजा अ. हमीद वजगरे २) शब्बीर अ. हमीद वजगरे ३) शमीम अ.हमीद वजगरे शाहीम नईम उलडे ५) शीरीन जाहिद दाते सर्व रा. मु. पो. मजगाव, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या मालकीची खालील नमूद केलेली मिळकत हि विद्यमान मालक याच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मजगाव ता.मुरुड, जि.रायगड | १२७ | ०-२९-८० पो.ख.०-०३-३० एकूण ०-३३-१० | ७.९४ |

सदर वर नमूद केलेली भातशेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे .

अलिबाग
तारीख : २५/११/२०२५

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

वादी तर्फे वकील,
ॲड. जयेश अ. जोशी,
दिवाणी स्पे.मु.नं.१११/२०१७,
नि.

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, रायगड यांचे कोर्टात**

श्री. दत्तात्रेय मुकुंद जोशी, वगैरे — वादी
वि.
श्री. मंगेश जनार्दन कमाने, वगैरे — प्रतिवादी

प्रति,
श्री. दिलीपकुमार फतेहलाल खेरोदिया, रा. वर्धमान बंगला, प्लॉट नं. १९, रोड नं. १७, सेक्टर १९, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड (प्रतिवादी क्र. ३)

ज्याअर्थी श्री. दत्तात्रेय मुकूंद जोशी, वगैरे यांनी या न्यायालयात सदरील दावा दाखल केला असुन त्या कामी तुम्ही प्रतिवादी क्र. ३ म्हणुन सामील आहात. तुमचे वर नमुद पत्त्यावर मे. कोर्टामार्फत समन्स पाठवले असता तुम्ही सदरील ठिकाणी रहात नसल्याचे लिहून आल्याने तुम्हास या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, तुम्ही स्वतः अगर वकिलांमार्फत दिनांक १७/१२/२०२५ रोजी या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता हजर राहून तुमचे लेखी म्हणणे सादर करावे. तुम्ही गैरहजर राहील्यास सदरील दाव्याचे कामी पुढील योग्य ते आदेश तुमच्या अनुपस्थितीत करण्यात येतील हे कळावे.

आज दिनांक २४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक,**
**दि.न्या.व.स्त. रायगड-अलिबाग**

सही/-
**अधिक्षक**
**दि.न्या.व. स्त.रायगड-अलिबाग**

## जाहीर सूचना

आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात श्री. सुभाष शंकर कडव व श्री. सुनील शंकर कडव, दोघेही प्रौढ, राहणार ६७/बी, मोहो पोस्ट चिकले, ता. पनवेल, गणपती मंदिरामागे, मोहो, रायगड, महाराष्ट्र - ४१०२२१ यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. कोणाही व्यक्तीचा वा व्यक्तींचा खालील निर्देशित अनुसूचीमध्ये विवरणीत शेअर्स व जागेसंदर्भात वा त्यांसंदर्भात कोणताही करार, विक्री, हस्तांतरण, गहाण, प्रभार, धारणाधिकार, भार, भेट, मृत्यूपश्चात वारसा, विमोचन, विनिमय, सुविधाधिकार, हक्क, निषेधाज्ञा व स्थिती, वहिवाट, ताबा हक्क, अभिहस्तांकन, भाडेकरार, उप-भाडेकरार, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, भागीदारी करारनामा, कर्जे, वापर, ताबा, विभाजन, न्यास, उत्तराधिकार, थकित कर व/वा दंड, देणी व देखभाल, जप्ती, निषेधाज्ञा, निवाडा, आदेश, हुकूम, विचाराधीन विवाद व/वा मूळ हक्क दस्तावेजांद्वारे त्यांचा ताबा/कस्टडी स्वरूपात वा अन्य कोणत्याही स्वरूपात वा कशाही स्वरूपात कोणताही दावा, मागणी, हिस्सा, हक्क, अधिकार व/वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात, कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत अधोहस्ताक्षरितांना त्यांचे कार्यालय पत्ता २ रा मजला, भाग्योदय बिल्डिंग, ७९, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई -४०० ०२३ येथे सदर तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा दाव्यांच्या, काही असल्यास, कोणत्याही संदर्भाविना चौकशी पूर्ण करण्यात येईल व दावे हे अधित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित अनुसूची**

शेतजमीन विवरण मूळ भूखंड क्र. २८९, गट क्र. ५०/५, मोजमापित ०-१०-०० एच-आर-ए, अर्थात १००० चौ. मी., महसूल नोंदींनुसार, गाव मोहो, तालुका पनवेल, जिल्हा रायगड व अंतिम भूखंड क्र. १४०ए, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा पनवेल येथील.

**मे. मार्कंड गांधी ॲन्ड कं. करिता**
**वकील व सॉलिसिटर्स**

दिनांक : २५.११.२०२५

## PUBLIC NOTICE

May it be known to the public by this notice that our client has decided to buy the following land from the concerned land owners and the talks are on.

**Description of the lands**

| Village | Gat No. | Area (H.A.) | Assessment (Rs.Ps.) |
|---|---|---|---|
| Bamansure, Taluka Alibag, Dist. Raigad | 114 | 0-25-00 P.K.0-05-00 Total 0-30-00 | 3.35 |

If anybody having any claim over the lands such as mortgage, gift, lease, agreement of sale, maintenance, charge, easements, inheritance, trust, tenancy rights or any other claim should be communicated in writing with documents in evidence to the undersigned within (14) fourteen days. If no such claim is staked within the period it will be presumed that no one has any claim in the lands or have waived in favour of our clients and our clients shall have the purchase transaction presuming the lands as free from all encumbrances.

Alibag,
Date : 25/11/2025.

**Adv.Sunil K. Wakade**
D-1, Ground Floor, Hirabaug Co.Op. Hsg. Society, Behind Modakam Hotel, Alibag.
Mob.9867715524.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री. जयसिंग सिसोदिया मयत तर्फे वारस १) राजकुमारी रत्ना सिंह, २) भूवन्यू सिंह, ३) तनुश्री कुमारी सिंह सर्व रा. दिल्ली यांची मौजे कोळगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कोळगांव, ता.अलिबाग, जि. रायगड | १९२ | ०-१४-२० | १.७२ |

मौजे कोळगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १९२ ही बागायती मिळकत असून सदरहू मिळकतीमध्ये सासवणे ग्रामपंचायत हद्दीत घर नं. १०७१ ने ओळखले जाणारे घर सुध्दा आहे.

मौजे कोळगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १९२ या मिळकतीची व त्यामध्ये असलेल्या घराची देखभाल करण्यासाठी श्री.विनय राजाराम घरत हे सन १९९८ ते २०२१ सालापर्यंत नोकर म्हणून देखभाल करत होते. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी आरती विनय घरत ही सुध्दा देखभाल करत होती. सन २०२१ मध्ये श्री.विनय राजाराम घरत हे आजारपणापमुळे मयत झाले. सन २०२१ सालापासून श्री. विनय राजाराम घरत यांची पत्नी आजतागायत देखभाल करत आहे. सन २०२५ मध्ये जमिनीचे मालक श्री. जयसिंग सिसोदिया हे मयत झाले. ते जिवंत असताना आरती विनय घरत त्यांचा नोकर म्हणून असलेला पगार देण्यासंबंधी वादविवाद झाले. श्री.जयसिंग सिसोदिया हे मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांनीसुध्दा आरती विनय घरत हिच्याबरोबर पगाराविषयी वाद विवाद केले व आरती विनय घरत यांना मिळकतीतून बेदखल करत आहेत असे दि. २४/१०/२०२५ रोजी दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या नोटीसवरुन दिसून आले. त्यामुळे आरती विनय घरत व सौ.पुजा महेंद्र थळे यांनी सदरहू मिळकतीसंदर्भात अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात स्पेशल मुकदमा नं.१२१/२०२५ ने दावा दाखल केलेला आहे.

मौजे कोळगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं.१९२ या मिळकती संदर्भात दावा दाखल असल्यामुळे कुणीही कोणत्याही प्रकारचा जमिन मालकांबरोबर खरेदी-विक्रीचा अथवा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २५/११/२०२५

**ॲड.सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मौजे वडवली तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मोहन गुंडप्पा सोनार | ४८/२ | ०.३९.०० | ६.६८ |
| मोहन गुंडप्पा सोनार | ६८/३ | ०.५४.०० | ५.०६ |
| समीर यशवंत साळोखे | ६८/८ | ०.०७.८० | ०.०५ |
| समीर यशवंत साळोखे | ६९/९ | ०.०१.०० | ०.०२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २६/११/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकतीचे मालकीहक्क पडताळणी साठी सदरहू जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

**मौजे वडवली तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव नाव | भुमापन क्र .व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| रमेश जावंतराव परमार वगैरे | ४९/५ | ००.१६.२० | २.५३ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २६/११/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मौजे वडवली तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| लिलाबाई दत्तात्रय तळपे वगैरे | ६४/१ | ०.३७.३० | ६.६८ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २६/११/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १)रोहिणी पंढरीनाथ खांगटे २)अमोल पंढरीनाथ खांगटे ३) रोहन पंढरीनाथ खांगटे ४)रूपेश पंढरीनाथ खांगटे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| ९६/० | एकूण क्षेत्र ३२-९८-०० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र | १२-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्कहितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/११/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मौजे वडवली तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| तारामती हरिश्चंद्र लदगे वगैरे | ४९/१ | ०.५२.३० | ८.१९ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २६/११/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मौजे वडवली तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| सुमन रघुनाथ भगत वगैरे | ६३ | ०.६७.८० | १२.८१ |
| | ५१/३ | ०.४६.८० | ८.५६ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २६/११/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड मो.नं.९०४९४८६८०५

## -: जाहीर नोटीस :-

**मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दि. १२/११/२०२५ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावास मान्यता मिळालेली असल्यामुळे खालील □□क्रा□ संस्थांची □न २०२५-२०२६ ते २०२९-३० या कालावधीकरिता निवडणूक कार्यक्रम दि. २६/११/२०२५ रोजी संस्थेचे नोटीस बोर्ड व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यांत आलेला आहे. नामनिर्देश अर्ज विक्री व स्विकृती तसेच नामनिर्देशन पत्राची छानि व नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे ठिकाण हे मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड, पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार भवन, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड, कर्जत, जि. रायगड आहे.**

| अ. क्र. | संस्थेचे नांव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पद | नामनिर्देशन पत्रे वाटप व स्विकृती करण्यासाठी तारीख, वेळ | नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे दिवस | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप दिनांक | मतदान दिनांक, वेळ व स्थळ | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ व निकाल जाहिर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कळंब एकता ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., कळंब, ता. कर्जत, जि. रायगड | श्री. शिवाजी बा. घुले, □□व्यक □□धक | दि. २७/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ आणि दि.०१/१२/२०२५ व दि. ०३/१२/२०२५ ते ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि.०५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.०६/१२/२०२५ ते दि.२०/१२/२०२५ रोजी □काळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत | दि.२१/१२/२०२५ रोजी □काळी ११.०० वाजता | दि. २८/१२/२०२५ रोजी सकाळी ०८.०० ते □ायंकाळी ०५.०० वाजेपर्यत. संस्थेच्या आवारात | दि. २८/१२/२०२५ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यत व निकाल जाहीर -मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |
| २ | संकल्प ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड | श्री. सुनिल किसन दांगट, सहकारी अधिकारी (श्रेणी-२) | दि. २७/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ आणि दि.०१/१२/२०२५ व दि. ०३/१२/२०२५ ते ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि.०५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.०६/१२/२०२५ ते दि.२०/१२/२०२५ रोजी □काळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत | दि.२१/१२/२०२५ रोजी □काळी ११.०० वाजता | दि. २८/१२/२०२५ रोजी सकाळी ०८.०० ते □ायंकाळी ०५.०० वाजेपर्यत. संस्थेच्या आवारात | दि. २८/१२/२०२५ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यत व निकाल जाहीर -मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |
| ३ | ड्रीम्स पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड | श्री. अंकुश शिंदे, लेखापरिक्षक, श्रेणी-२ | दि. २७/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ आणि दि.०१/१२/२०२५ व दि. ०३/१२/२०२५ ते ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि.०५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.०६/१२/२०२५ ते दि.२०/१२/२०२५ रोजी □काळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत | दि.२१/१२/२०२५ रोजी □काळी ११.०० वाजता | दि. ०४/०१/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते □ायंकाळी ०५.०० वाजेपर्यत. संस्थेच्या आवारात | दि.०४/०१/२०२६ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यत व निकाल जाहीर -मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |
| ४ | अरिहंत अलोकी फेज-१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सर्व्हे नं. ५२, हिस्सा नं. ३३ ए/बी/सी, भिसेगांव, ता. कर्जत, जि. रायगड | श्री. अंकुश शिंदे, लेखापरिक्षक, श्रेणी-२ | दि. २७/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ आणि दि.०१/१२/२०२५ व दि. ०३/१२/२०२५ ते ०४/१२/२०२५ रोजी सकाळी १२.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०५/१२/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता | दि.०६/१२/२०२५ ते दि.२०/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत | दि.२१/१२/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता | दि. ३१/१२/२०२५ रोजी सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत. संस्थेच्या आवारात | दि.३१/१२/२०२५ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यत व निकाल जाहीर -मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |

(सुनिल किसन दांगट )
निवडणूक निर्णय अधिकारी

(अंकुश शिंदे)
निवडणूक निर्णय अधिकारी

(शिवाजी बा.घुले)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
कर्जत तालुका, जि.रायगड

## निवडक



### विद्युत खांबांना मातीचा आधार

**उरण :** तालुक्यातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे.मात्र महावितरण कार्यालयाच्या भ्रष्ट कारभारांनी उरणमधील विद्युत पोल उभे करण्यासाठी सर्रास सिमेंट ऐवजी मातीचा वापर केला आहे.त्यामुळे भविष्यात विद्युत वाहक पोल पडून अपघात होऊन नागरिकांच्या व त्या ठिकाणांहून ये-जा करणाऱ्या गायी, म्हशी यांच्या जीवातास धोका निर्माण होणार आहे. तरी राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या भ्रष्ट कारभाराची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. महावितरण कार्यालयाच्या भ्रष्ट कारभारांने उरणमधील विद्युत खांब उभे करण्यासाठी सिमेंट ऐवजी मातीचा वापर केला आहे. विद्युत वाहक लोखंडी पोलांना आधार देण्याचे काम ही केले जात नाही. त्यामुळे मातीत उभे करण्यात आलेले लोखंडी पोल लवकरात लवकर सडण्याचा धोका अधिक आहे.एकंदरी पावसाळ्यात,वादळात विद्युत वाहक खांब पडून अपघात होऊन नागरिकांच्या व त्या ठिकाणांहून ये-जा करणाऱ्या पाळीव जनावरांच्या जीवातास धोका निर्माण होणार आहे.

### कुसावडे येथे भव्य कीर्तन महोत्सव

**रसायनी :** कोयना पुनर्वसाहत मराठा समाज सेवा संघ(रजि.)



रायगड, ठाणे व पालघर यांच्या वतीने तीन दिवसाचा भव्य किर्तन महोत्सव खालापूर तालुक्यातील कुसावडे (वडवळ) येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाकैवल्य तेजोनिधी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७५० व्या जन्मोत्सव सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त कोयना पुनर्वसाहत मराठा समाज सेवा संघाचे अध्यक्ष तुळशीराम काशिराम सावंत, कार्याध्यक्ष श्रीरंग भातोसे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली ज्ञानेश्वर शेलार व श्रीरंग साळुंखे यांच्या मार्गदर्शनाने तीन दिवसीय भव्य किर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला होता. समाजातील थोर महात्मे किर्तनकार, प्रवचनकार व वारकरी संप्रदाय यांच्या अध्यात्मिक ज्ञानात भर पडावी, कोयना मराठा समाज एक संघ, एकरूप रहावा, समाजातील तरुण, तरुणी कीर्तनकार यांना मार्गदर्शन व्हावे असा उद्देश या किर्तन महोत्सवात होता असे समाजाचे अध्यक्ष तुळशीराम सावंत यांनी सांगितले.

### अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे उभारण्यात आलेल्या दत्त मंदिरात साजऱ्या होणाऱ्या श्री दत्तजयंती उत्सवानिमित्ताने, अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



करण्यात आले आहे. हा अखंड हरिनाम सप्ताह ३० नोव्हेंबर पर्यंत श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण सोहळा भगवंताच्या अधिष्ठानाने, सद्गुरु माऊली हसुराम बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि गुरुकुलाच्या सहकार्याने सुरू असल्याची माहिती दत्तात्रेय महाराज यांनी दिली. यामध्ये सायंकाळी सहा वाजता दीपोत्सवाचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. दरम्यान या अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, वाचन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांबरोबर श्री सांप्रदाय नरेंद्र महाराज व सद्गुरु माऊली हसूराम बाबा यांच्या सांप्रदायाचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. आश्लेषा केणी या दहा वर्षाच्या कीर्तनकार चिमुरडीने सोमवारी सादर केलेल्या कीर्तनातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. तर प्रवचनकार प्रभाकर, मुकुंद, दीपा म्हात्रे, विलास, विश्वास, नथुराम परदेशी, रमेश तसेच कीर्तनकार एकनाथ, अश्लेषा केणी, हिराजी, दिपाली जाधव, निळकंठ, नंदकुमार, महेश या सर्वांचे प्रवचन व कीर्तनाचे कार्यक्रम सुरू असून दत्त मंदिराच्या भव्य प्रांगणात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. रविवार (दि. ३०) नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता अनिल महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.



### विद्यार्थ्यांना महाविस्तार ॲपचे प्रशिक्षण

**म्हसळा :** वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय, म्हसळा येथे शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या महाविस्तार ॲप, फार्मर आयडी आणि पीएम किसान योजनेवरील मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाला प्राचार्य डी. ए. टेकळे, मंडळ कृषी अधिकारी सुनिल कुमार घाडगे, तसेच सहाय्यक कृषी अधिकारी प्रदीप शिवतोळे, खंडू मोहळकर, धनंजय चाटे आणि आधारज गायकवाड हे अधिकारी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना महाविस्तार ॲपमधील पीक व्यवस्थापन, हवामान अंदाज, कीड-रोग नियंत्रण, खत नियोजन यांसह ॲपमधील चॅट बॉक्स कसा वापरायचा याचे प्रात्यक्षिक दाखवले. विद्यार्थ्यांनी मोबाईलवरून ॲप डाउनलोड करून नोंदणी, लॉगिन आणि माहिती शोधण्याचा प्रत्यक्ष सराव केला.बैठकीत शेतकरी आयडी नोंदणी, पी. एम. लाभासाठी आवश्यक प्रक्रिया व केवायसी, तसेच शेतकऱ्यांसाठी उपलब्ध विविध शासकीय योजनांची माहितीही देण्यात आली.

# अनधिकृत बॉक्साईड उत्खनन तेजीत

## बॉक्साईडच्या अवजड वाहतुकीमुळे रस्त्यांची दुर्दशा; प्रादेशिक परिवहन विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

यावर्षी लांबलेला पावसाळा संपल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा अनधिकृत बॉक्साईड उत्खनन तेजीत सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. बॉक्साइड उत्खनन करून अनेक व्यक्ती आपला उत्कर्ष साधत आहेत. परंतु यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनधिकृत उत्खनन अशाच प्रकारे सुरू राहिल्यास केरळमधील वायनाडच्या घटनेची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही. बॉक्साइड उत्खनन करताना शासनाकडून अनेक नियम व अटी घालुन दिलेल्या असतात.

परंतु बॉक्साईटचे उत्खनन करणाऱ्या कंपन्यांकडून यापैकी कोणत्याही गोष्टीचे पालन केले जात नाही. ज्या ठिकाणी जमिनीमध्ये खोलवर ड्रिल मारून बॉक्साईडसाठी ब्लास्ट घडविला जातो. त्या ठिकाणी बॉक्साईड



काढून झाल्यानंतर पुन्हा माती भराव करून त्यावरती वृक्ष लागवड करणे बंधनकारक आहे. परंतु आजपर्यंत श्रीवर्धन तालुक्यात हजारो टन बॉक्साईडचे उत्खनन होऊन सुद्धा कुठल्याही कंपनीने पर्यावरणाशी आपली बांधिलकी जपलेली पाहायला मिळत नाही.

काही महिन्यापूर्वी बॉक्साईड उत्खननाची वाहतूक करणाऱ्या काही टोळ्यांनी आपला असलेला पक्ष बदलून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात केवळ या धंद्यासाठीच प्रवेश केल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. बॉक्साईडचे उत्खनन करण्यासाठी जे ब्लास्ट केले जातात, त्यानंतर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुरक्षा सुविधा राबविली जात नाही. उत्खननासाठी ड्रिल केलेल्या बोगद्यात पावसाचे पाणी साठून श्रीवर्धन तालुक्यात देखील आगामी काळात मोठे भूस्खलन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र महसूल प्रशासनाकडून या बॉक्साईड उत्खनाकडे डोळेझाकच करण्याचे धोरण अवलंबिले जात आहे.

बॉक्साइडचीवाहतूककरणाऱ्या माफीयांनी या सर्व यंत्रणांना आर्थिक तडजोडीमध्ये गुंतवून ठेवल्यामुळे अवजड वाहतुकीचा त्रास सामान्य नागरिकांना होत आहे.

> **बॉक्साईडची अवजड वाहतूक क्षमतेपेक्षा जास्त घेऊन जाणारे मालवाहू ट्रक, गाडी भरलेली असताना अत्यंत कमी वेगाने घाट चढत असतात. रिकामी करून आल्यानंतर सदरच्या गाड्या अतिशय वेगाने येत असल्यामुळे अनेक वेळा अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईड भरलेल्या गाड्यांचे अनेक वेळा अपघात होऊन त्यामध्ये चालकांना आपले प्राण देखील गमवावे लागले आहेत. या अवजड वाहतुकीवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही.**

श्रीवर्धन तालुक्यातील मेघरे, सायगाव, कुरवडे, खुजारे या गावांच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावरती बॉक्साइड उत्खनन झालेले आहे व यापुढेही केले जाणार आहे. श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटनासाठी पर्यटकांच्या पसंतीचे क्रमांक एकचे ठिकाण आहे. परंतु या ठिकाणाहून अशाच प्रकारे बॉक्साइड वाहतूक होत राहिली तर या ठिकाणचे निसर्ग सौंदर्य धोक्यात येईल व या ठिकाणी होणाऱ्या पर्यटन व्यवसायावर त्याचा गंभीर परिणाम झाल्याशिवायराहणारनाही.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अनधिकृत उत्खनाबाबत तातडीने कारवाई करून या ठिकाणच्या वनसंपत्तीचा व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. याची दक्षता घेण्याची मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# उरण नगरपरिषदेत दुबार मतदारांचा मुद्दा उफाळला

## महाविकास आघाडीचा पाच हजारांहून अधिक दुबार मतदारांचा आरोप; प्रशासनाकडून केवळ ७२१ मतदारांची नोंद

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषद निवडणुकीत दुबार व बोगस मतदारांचा प्रश्न धगधगता मुद्दा ठरत असून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नगरपरिषद क्षेत्रातील एकूण २६,५०० मतदारांपैकी तब्बल पाच हजारांहून अधिक मतदार दुबार असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर आणि मनसे पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

देशभरात काँग्रेस, तर राज्यात महाविकास आघाडी आणि मनसेने बार व बोगस मतदारांच्या मुद्द्यावर निवडणूक आयोगासमोर आक्षेप नोंदवले आहेत. उरण नगरपरिषद आणि उरण विधानसभा परिसरातही अशाच प्रकारच्या मतदार नोंदणीत गंभीर तफावत दिसून आली आहे. या संदर्भात निवडणूक विभागाकडे




अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली असून दहा प्रभागांत मिळून पाच हजारांहून अधिक दुबार मतदारांचा आरोप केला आहे.

उरण नगरपरिषद प्रभागांमध्ये मतदारसंख्या तुलनेने कमी असल्याने विजयी आणि पराभूत उमेदवारांतील मतांचे अंतरही अल्प असते. अशा परिस्थितीत दुबार किंवा बोगस मतदारांचे मतदान हे थेट अंतिम निकालावर परिणाम करू शकणारे ठरते. याच कारणामुळे या मुद्द्याचे गांभीर्य वाढले असून पक्षांकडून निवडणूक आयोगाकडे तातडीने कारवाईची मागणी केली जात आहे.

महाविकास आघाडी आणि मनसेच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम यांनी अधिकृत आकडेवारी जाहीर केली. उरण नगरपरिषद क्षेत्रात केवळ ७२१ दुबार मतदारांची नोंद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या सर्व मतदारांची यादी तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित मतदान केंद्रांच्या अधिकाऱ्यांना योग्य ती नोंद व पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात येणार असून, दुबार मतदानाचा प्रयत्न झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.महाविकास आघाडी आणि म नसेचा आणखी एक आरोप असा की उरण शहरात वास्तव्य करणारे काही मतदार हे आसपासच्या गावांच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या मतदार यादीतही नाव ठेवून मतदान करतात. यामुळे एकाच व्यक्तीकडून विविध ठिकाणी मताधिकाराचा गैरवापर होण्याची शक्यता वाढते आणि स्थानिक निवडणुकांची निष्पक्षता धोक्यात येते, असे त्यांचे मत आहे.

या सर्व घडामोडींमुळे उरण नगरपरिषद निवडणुकीतील दुबार मतदारांचा मुद्दा हा प्रमुख चर्चेचा विषय बनला आहे. नागरिकांमध्येही या प्रकरणाबाबत संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण झाली असून निवडणूक आयोगाने सखोल चौकशी करून निवडणूक सुनिश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

# ३५ वर्षानंतर मिळाला तडजोडीने न्याय

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत दिवाणी कोर्टातील सर्वात जुना दावा अशी ख्याती असलेला दिवाणी दावा नं.३८/१९९१ वाळकु खारीक वगैरे विरुद्ध बाळू खारीक वगैरे हा कर्जत तालुक्यातील शेलू गावातील जमिनीबाबतचा भावकीतील वाटपाचा दावा अखेर ३५ वर्षानंतर तडजोडीने मिटला. या दाव्याच्या कामी वादी तर्फे ॲड. विवेक पेठे तर प्रतिवादी तर्फे ॲड. संदीप बागडे व ॲड.अक्षय पेमारे यांनी कामकाज पाहिले.

वर्षानुवर्षांची दोन पिढ्यांची एकमेकांबद्दल मनात द्वेषभावना असल्याने वादी प्रतिवादी हे तडजोडीपर्यंत कधी आले नव्हते. मात्र या दाव्याच्या कामी मयत प्रतिवादीचे वारस शकुंतला खारीक व नारायण खारीक यांच्या वतीने ॲड.संदीप बागडे हजर झाल्यानंतर त्यांनी या दाव्याच्या सुनावणीच्या अंतरिम युक्तिवादानंतर न्यायालयाला विनंती केली की, वादी, प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील असून वादी, प्रतिवादी आणि मी एकाच गावातील रहिवासी आहोत. या दाव्यात आजपावेतो तीन पिढ्या समाविष्ट झाल्या आहेत. या दाव्यामुळे वादी प्रतिवादी गेली अनेक वर्षे एकमेकांशी बोलत नाहीत. तसेच या दाव्यात तडजोड न झाल्यास या दाव्याच्या निकालानंतर अंतिम निर्णयाने व्यथित पक्षकार वरिष्ठ न्यायालयात जातील. व या दाव्याच्या प्रवास जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय असा होऊन अंतिम निर्णय होण्यास अजून १५ वर्षे नक्कीच जातील.

> **वाडवडिलांपासून गेली ३५ वर्षे आम्ही न्यायापासून वंचित होतो. वडिलांच्या मृत्यूनंतर २०२३ रोजी आम्हाला कोर्टाचे समन्स आल्यानंतर आम्ही आमच्या गावातील वकील संदीप बागडे यांच्याकडे गेलो. त्यांनी आमच्या दाव्याची कागदपत्रे पाहूनच सांगितले की या दाव्यात तडजोड होऊ शकते आणि आपल्याला न्यायही मिळू शकतो. त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आज आम्हाला ३५ वर्षानंतर न्याय मिळाला. आम्ही ॲड.संदीप बागडे यांचे आणि आम्हाला या दाव्याच्या कामी वेळोवेळी मदत करणारे भाऊ भोईर यांचे आभार व्यक्त करीत आहोत. तडजोडीने लवकर आणि योग्य न्याय कसा मिळेल हे समजावून सांगणाऱ्या वकिलांची समाजाला गरज आहे.**
> **- नारायण खारीक (पक्षकार)**

अशावेळी या दाव्याचा अंतिम निर्णय होण्यास जर ५० वर्षे लागत असतील तर इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर या दाव्यातील पक्षकारांना खरा न्याय मिळेल का? आणि त्यामुळे आजोबांनी दाखल केलेल्या दाव्याचा निकाल नातवाने घ्यायचा हा न्याय व्यवस्थेला लागलेला दोष कधीच पुसला जाणार नाही. त्यामुळे माननीय न्यायालयाला विनंती आहे की हे प्रकरण तडजोडीने मिटण्यासाठी प्रयत्न व्हावेत आणि त्यानुसार न्यायालयाने ॲड. बागडे यांना या दाव्याच्या तडजोडीबाबत विशेष प्रयत्न कराण्यास सांगितले. ॲड.बागडे यांनी केलेल्या प्रयत्नांना वादी दामू खारीक वगैरे, प्रतिवादी शकुंतला खारीक वगैरे व वादींचे वकील ॲड. विवेक पेठे यांनी सहकार्य केले.

> ३५ वर्षे चाललेल्या दाव्याच्या कामी तडजोड व्हावी अशी तळमळ होती. या दाव्याच्या निर्णयाने व्यथित पक्षकार अपिलात जातील व पुन्हा या दाव्याच्या प्रवास जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय असा सुरू होऊन या दाव्यातील पक्षकारांची आणखी १५ वर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत जातील हे उघड होते. माझ्या या प्रयत्नांना वादी, प्रतिवादी व वादीचे वकील ॲड. विवेक पेठे यांनी केलेल्या सहकार्यामुळे हा दावा तडजोडीने मिटला याचा आनंद होत आहे.
> - ॲड.संदीप बागडे

# सुदर्शन कंपनीने सोडविली पाण्याची समस्या

- **महिला वर्गाला मिळवून दिला दिलासा**
- **ग्रामस्थांनी मानले कंपनीचे आभार**



**। खांब । प्रतिनिधी ।**

गेल्या चार ते पाच वर्षांपासून चिंचवली गावाला पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या भेडसावत होती. या समस्येकडे सुदर्शन केमिकल्स कंपनी धाटाव या कंपनीने गंभीर दखल घेऊन येथील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवून महिला वर्गाला दिलासा मिळवून दिला आहे.

गावापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या विहिरीवरून महिलांना डोक्यावर पाणी आणावे लागत असे, तर पावसाळ्यात विहिरीपर्यंत जाणे धोकादायक ठरत असे. या परिस्थितीने ग्रामस्थ त्रस्त झाले होते. या समस्येवर उपाय म्हणून भिम सेवा संघ चिंचवली, माता रमाई महिला मंडळ आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकवर्गणीतून बोअरवेल मारली. परंतू बोअर पंप व फिटिंगसाठी निर्माण झालेल्या आर्थिक अडचण निर्माण झाली.याच वेळी सुदर्शन केमिकल कंपनीच्या सीएसआर विभागाने मदतीचा हात पुढे करून. गावाच्या बोअरपंप बसवणी व फिटिंगचा खर्च उचलला, ज्यामुळे चिंचवलीच्या पाणी समस्येचे कायमस्वरूपी समाधान झाले. कंपनीचा हा सामाजिक उपक्रम गावासाठी आशेचा किरण ठरला असून ग्रामस्थांनी याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सीएसआर प्रमुख माधुरी सणस, तसेच महेश डेरिया, अमर चांदणे, संग्राम पाटील, रवी दिघे, महेश बामुगडे यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. अध्यक्ष प्रमोद जाधव, उपाध्यक्ष गोपाळ कांबळे, भिम सेवा संघ चिंचवली, मुंबई कमिटी व माता रमाई महिला मंडळ यांनी संपूर्ण व्यवस्थापन सांभाळले.

सुदर्शन केमिकलने केलेले हे कार्य आम्हाला नवीन जीवन देणारे आहे. आता महिलांना दररोजचा त्रास कमी झाला असून सुरक्षित आणि स्वच्छ पाण्याचा स्रोत उपलब्ध झाला आहे असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# श्रीराम मंदिरात ध्वजरोहण संपन्न

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा शहरातील श्री राम मंदिर येथे हिंदु ग्रामस्थ मंडळ म्हसळा तर्फे ध्वजरोहण सोहळा आयोजित करण्यात आला होता. सकाळी श्री. रामाच्या मूर्तीवर नगरसेवक निकेश कोकचा यांनी सपत्नीक विधिवत अभिषेक केला. तदनंतर धर्म ध्वजाचे पूजन करण्यात आले. अयोध्येत धर्म ध्वज फडकविण्याची वेळ साधत श्री राम मंदिरावर देखील धर्म ध्वज फडकविण्यात आला. कार्यक्रमची सांगता महाआरतीने करण्यात आली. याप्रसंगी हिंदु ग्रामस्थ मंडळ म्हसळाचे सचिव सुशील यादव, उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे, शैलेश पटेल, गौरव पोतदार, संतोष उद्धरकर, दीपल शिर्के, निलेश करडे, विकास धारिया, अनिल बसवत, राजेंद्र बोरकर, निलेश मांदाडकर, तुकाराम पाटील, ललित चीपा आदी नागरिक उपस्थित होते.


## पत्रक वाटप केल्याने झाला वाद | संकेत पाटील यांची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

# ग्रामसभेतून वृद्ध महिलेची हकालपट्टी?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आपल्या जागेच्या प्रश्नांबाबत वारंवार तक्रार करूनही न्याय मिळत नाही. त्यामुळे संकेत पाटील यांनी सोमवारी ग्रामपंचायतीच्या सभेमध्ये काही सदस्यांना पुराव्याचे पत्रक वाटप केले. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी राऊत यांनी रोखून संकेत पाटील आणि त्यांच्या आईला हाकलून दिल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे.

याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली आहे. संबंधिताविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत ग्रामविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, सभा चालू असताना कोणतीही परवानगी न घेता पत्रक वाटप करीत होते. त्यांना रोखले. त्यानंतर त्यांना जाण्यास सांगितले असल्याचे



स्पष्ट केले.

संकेत पाटील यांच्या म्हणण्यानुसार, रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील पालव येथे त्यांच्या जागेमध्ये खातरजमा न करता, ग्रामपंचायतीने असेसमेंट उतारा लावला आहे. याबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रार दाखल केली आहे. मात्र त्याची

> **मागील महिन्याभरापासून रेवदंडा ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी म्हणून कामकाज हाती घेतले आहे. संकेत पाटील यांच्या लेखी तक्रारीची दखल घेत त्यांना स्पीड पोस्टाने पत्र देण्यात आले आहे. खासगी जागा असल्याने मोजणी करून घेण्यात यावी, असेही त्यांना सांगितले आहे. सोमवारी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत कोणतीही परवानगी न घेता, ते पत्रक वाटप करीत होते. त्यामुळे त्यांना रोखण्यात आले. बैठक सुरू असल्याने संकेत यांनाच जाण्यास सांगितले. त्यांच्या आईला हाकलून दिले नाही. ते माझ्यावर चुकीचा आरोप करीत आहेत.**
> **-सुदेश राऊत**
> **ग्रामविकास अधिकारी, रेवदंडा**

> **पालव येथील माझ्या जागेच्या प्रश्नांबाबत पाच ते सहा जणांना पत्रक वाटप केले. ग्रामसेवकांनी पत्रक वाटप करण्यास रोखले. तुम्हा मतदार नाहीत. त्यामुळे पत्रक वाटप करू शकत नाही. चालायला लागायचे असे सांगून मला आणि माझ्या आईला ग्रामपंचायत कार्यालयातून हाकलून दिले.**
> **- संकेत पाटील, तक्रारदार**

दखल न घेतल्याने २४ नोव्हेंबरला ग्रामपंचायतीमध्ये आयोजित केलेल्या ग्रामसभेत न्याय मागण्यासाठी संकेत पाटील आणि त्यांची आई असे दोघेजण ग्रामपंचायत कार्यालयात गेले होते. ग्रामपंचायतीच्या सभागृहात चालू असलेल्या सभेमध्ये पुराव्यांचे कागद संकेत हे सभासदांना वाटप करीत होते. त्यावेळी ग्रामसेवकांनी हरकत घेतली. संकेत आणि त्यांच्या आईला पत्रक वाटप करण्यास मनाई केली. हातवर करून बोट दाखवून त्यांना आणि त्यांच्या आईला सभेतून हाकलून आहे. संकेत यांच्या आईला योग्य वागणूक दिली नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडे तक्रार केली आहे. चौकशी करून संबंधिताविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

संकेत पाटील यांनी ग्रामसेवकावर केलेल्या आरोपासह तक्रारीबाबत पोलीस यंत्रणा काय भूमिका घेणार याकडे पाटील यांचे लक्ष लागू न राहीले आहे. गेल्या अनेक वर्षापासून जागेचा असलेला प्रश्न अद्याप सुटलेला नाही, तो देखील संबंधीत विभागाकडून सुटेल अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# धर्मेंद्र नावाचा सत्यकाम

क्रिकेट आणि हिंदी सिनेमा या दोन प्रांतांमध्ये कोणाला कधी व किती यश मिळेल हे सांगता येत नाही. अमोल मुजुमदारसारखा गुणवान फलंदाज धावांचे डोंगर उभारतो. पण त्याला कसोटीचे दार शेवटपर्यंत उघडत नाही. हिंदी सिनेमामध्ये राजेंद्रकुमार, मनोजकुमार यांच्यासारखे बथ्थड चेहऱ्याचे लोक ज्युबिली स्टार होतात. याउलट कितीतरी गुणी अभिनेते पाहता पाहता नामशेष होतात. सोमवारी मुंबईत निधन पावलेले धर्मेंद्र हे दिलीपकुमार यांच्याप्रमाणे उत्तम अभिनेते नव्हते. देव आनंद किंवा शशी कपूर यांच्याप्रमाणे चॉकलेट हिरो होऊ शकत नव्हते. पंजाबी असूनही त्यांना नाचता तर बिलकुल येत नव्हते. तरीही त्यांच्यामध्ये असे काहीतरी होते जे प्रेक्षकांना भावले. ज्या जोरावर ते जवळपास तीस वर्षे चित्रपटसृष्टीत काम करीत राहिले व त्यांना उत्तम यश मिळाले. त्यातूनही विशेष असा की, ही-मॅन किंवा तगडा पुरुष अशी ओळख असूनही त्यांना विविध प्रकारच्या भूमिका करायला मिळाल्या व लोकांनाही त्या पसंत पडल्या. इतक्या प्रदीर्घ काळ अशी संधी उपलब्ध झालेले दुसरे एकमेव अभिनेते म्हणजे अशोककुमार. धर्मेंद्र हे मूळचे लुधियानाचे. फाळणीच्या पूर्वीच्या अविभाजित पंजाबमधील बहुसंख्य तरुणांना त्यावेळी मुंबईच्या हिंदी चित्रपटसृष्टीचे आकर्षण होते. त्या काळातील शंभरपैकी ६० कलाकार तरी पंजाबमधूनच आलेले दिसतात. धर्मेंद्रही तसेच आले. दिलीपकुमार यांच्या अभिनयाने ते पागल झाले होते. त्यांचे सिनेमे पाहण्यासाठी आपण कोठे कोठे गेलो याची सीमाच नाही असे त्यांनी एका मुलाखतीत म्हटले होते. गंमत म्हणजे फिल्मफेअरने आयोजित केलेल्या एका टॅलंट हंट स्पर्धेतील विजेता म्हणून धर्मेंद्र मुंबईत आले. याच फिल्मफेअरचे पारितोषिक मात्र त्यांना कधीच मिळू शकले नाही. अनेक सिनेमांमध्ये उत्तम काम करूनही त्यांना फिल्मफेअरने हुलकावणी दिली. अखेरीला त्यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आले तेव्हा आपण ३५ वर्षे याची वाट पाहत होतो असे त्यांनी मोकळेपणाने सांगितले. पण ते खूप पुढे. आरंभी १९६० च्या दशकात त्यांना प्रामाणिक, साध्यासुध्या तरुणांच्या भूमिका मिळाल्या. प्रेम हाच तेव्हा व आजही बहुसंख्य चित्रपटांचा विषय असतो. दिल भी तेरा, हम भी तेरे हा त्यांचा पहिला चित्रपट. याच्या नावावरूनच त्याची कथा कळते. मुझ को इस रात की तनहाई में आवाज न दो .. किंवा... बहारों में मेरा चमन लूट कर.. ही मुकेशच्या आवाजातील गाणी त्यांच्यावर चित्रीत झाली आहेत त्यावरून ते किती हळव्या प्रेमिकांच्या भूमिका करीत होते हे कळेल. शोलेतील वीरू किंवा धरमवीरमधील वीर यावरूनच धर्मेंद्र यांना ओळखणाऱ्या पुढच्या पिढीला हे कदाचित आश्चर्यकारक वाटेल. पण बंदिनी, ममता, अनुपमा अशा अनेक नायिकाप्रधान बंगाली थाटाच्या चित्रपटांमध्ये धर्मेंद्र यांचा देखणा चेहरा, खालच्या पट्टीतील बोलणे हे चांगले सामावून गेले. हकिगतसारख्या चिनी युध्दावरील चित्रपटात त्यांना सैनिकाची भूमिका मिळाली. पण मीनाकुमारीच्या फूल और पत्थर किंवा नंतर आँखे व त्याहीनंतर मेरा गाव मेरा देश यासारख्या डाकूपटामधून ते हाणामारी करणारे नायक म्हणून प्रस्थापित झाले. तगडी व रांगडी शरीरयष्टी होतीच. राजकुमार तर त्यांना पहलवानच म्हणत असे. पण हा पहलवान लोकांना एकदम आवडला.

## बच्चनसोबतही तगडे

गंमत अशी की, या हाणामारीच्या नायकाचे एकदम वेगळे रुप असलेले व धर्मेंद्र यांचे सर्वात उत्तम म्हणता येतील असे चित्रपट त्याच काळात आलेले आहेत. एक म्हणजे सत्यकाम व दुसरा चुपके चुपके. सत्यकाममध्ये कायम सत्य बोलणाऱ्या व नैतिकतेचा आग्रह धरणाऱ्या एका इंजिनिअरची भूमिका त्यांनी केली होती. सरकारी कंत्राटांच्या भ्रष्ट व्यवस्थेत सत्यकाम हा बेकार व निरुपयोगी ठरतो. निराश होतो. पण शेवटी मृत्यूनंतर त्याचा विजय होतो. याउलट चुपके चुपकेमध्ये एका साध्यासरळ प्राध्यापकाची भूमिका त्याने केली आहे. त्यातली विनोदाचे त्याचे टायमिंग खुद्द अमिताभ बच्चनपेक्षाही भाव खाऊन गेले. किंबहुना, बच्चनसोबत उभे राहूनही आपल्या कामाचा ठसा उमटवू शकणारे व एकूण चित्रपटाला वर घेऊन जाणारे एक-दोनच अभिनेते झाले. त्यात एक धर्मेंद्र आहे. शत्रुघ्न सिन्हा किंवा अगदी विनोद खन्ना हे बच्चनसमोर विविध चित्रपटांमध्ये निष्प्रभ झालेले दिसतात. दीवारमध्ये इन्स्पेक्टरची व्यक्तिरेखा ताकदवान असूनही शशी कपूर तिच्यात जान ओतू शकला नाही. धर्मेंद्र मात्र शोलेमध्ये बच्चनपेक्षाही अधिक भाव गेला. त्याचा पाण्याच्या टाकीवरचा सीन किंवा ये दोस्त गाण्यातील मस्ती किंवा तुरुंगातील असरानीला चकवण्याचा सीन किंवा, बसंती इन गुंडों के सामने तू नाचना मत असे सांगणारा वीरू हाच लोकांच्या लक्षात अधिक राहतो. धर्मेंद्र याना असे यश मिळत गेले तरी बच्चनसारखे सुपरस्टारपदाला पोचू शकले नाहीत. किंवा अभिनयाच्या बाबतीतही फार वर जाऊ शकले नाहीत. त्यामुळे १९८० च्या दशकात ते हाणामारीच्या सिनेमांमध्ये अधिक रमले. कुत्ते कमीने यासारखे त्यांचे डायलॉगच अधिक ऐकू येऊ लागले. नंतर तर त्यांनी बी ग्रेड सिनेमांमध्येही कामे केली. ते त्यांनी टाळले असते तर अधिक बरे झाले असते. पण कदाचित काम करीत राहणे हाच त्यांच्या आनंदाचा भाग होता. यश, पैसा आणि हेमा मालिनीसारखी बायको वगैरे त्यांना आधीच मिळून गेली होती. धर्मेंद्र हे त्यांच्या जिंदादिल व उदार स्वभावाबद्दल प्रसिध्द होते. सेटवरच्या लहानसहान कामगारांना पैसे किंवा अन्य मदत करणारा, लुधियाणातून कोणीही भेटायला आला तर त्याच्यासाठी कितीही वेळ काढणारा असा हा साधासुधा माणूस होता. स्टारडम त्याच्या डोक्यात गेले नव्हते. अखेरच्या काळात तर ते मुंबईच्या गजबजाटापासून दूर जाऊन लोणावळ्यात चक्क शेती करीत होते. शेतीत काय पिकवले आहे त्याचे त्यांचे व्हिडिओ इंटरनेटवर ते टाकत असत. अगदी शेवटच्या काळात त्यांनी जॉनी गद्दारसारख्या रहस्यमय चित्रपटात त्यांनी साईड रोल केला. त्यातही ते शोभून दिसले.

## रांगडा माणूस

मध्यंतरी भाजपने त्यांच्या लोकप्रियतेचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करून घेतला. बिकानेरमधून त्यांना खासदार केले. पण राजकारणात त्यांचा जीव रमला नाही. आपण सादर केलेल्या योजना भलत्यांनीच पळवून नेल्या अशी तक्रार करण्याची वेळ धर्मेंद्र यांच्यावर आली. विनोद खन्ना गुरुदासपूरमधून खासदार झाले. त्यांच्यावरही तीच पाळी आली होती. हेमा मालिनी या मात्र मथुरामधून किमान तीन वेळा निवडून आल्या. हेमा मालिनी यांच्यासारखा धोरणीपणा त्यांना जमला नाही. गंमत म्हणजे त्यांचे मित्र अमिताभ बच्चन हेही एकदाच खासदार होऊन राजकारणातून पळून गेले. याउलट जया बच्चन आजतागायत राज्यसभेचे खासदारपद टिकवून आहेत. असो. धर्मेंद्र यांना भाजपची कडवी हिंदुत्वाची व मुस्लिमांचा द्वेष करणारी विचारसरणी मान्य होणे कठीण होते. भाजपवाले उर्दूचा द्वेष करणारे. याउलट उर्दू शायरीवर धर्मेंद्र यांचे मनापासून प्रेम होते. आपले आत्मचरित्रही त्यांनी उर्दूतून लिहिले होते. ते स्वतःही कविता करत. शिवाय हेमा मालिनीशी लग्न करताना द्विभार्या प्रतिबंधक कायदा आडवा येईल म्हणून तेव्हा त्यांनी चक्क धर्म बदलला होता व स्वतःचे नाव दिलावर खान असे केले होते. अर्थात, दुसरे लग्न केले तरी पहिल्या पत्नीला व मुलांना त्यांनी अंतर दिले नाही. सनी देवल, बॉबी देवल हे पुढे धर्मेंद्र यांच्या पावलावर पाऊल टाकून सिनेमात आले. त्यांना धर्मेंद्र यांचा मोठा आधार होता. एकूणच माणसांवर प्रेम करणारा हा साधासुधा रांगडा पंजाबी माणूस होता. चित्रपटसृष्टीत असताना त्याने भांडणे केली असतील. पण त्याच्याविषयी वाईट भावना निर्माण व्हावी असे त्याने कधीही काहीही केले नाही. सिनेमातील पडद्यावरची माणसे साधीभोळी, प्रामाणिक असण्याच्या काळात धर्मेंद्र या सृष्टीत आले. नंतर नायक हाणामारी करू लागले तरीही ते अतिशय चांगल्या प्रवृत्तीचे व मोठ्यांपुढे नम्र असेच होते. धर्मेंद्र पडद्यावरच्या त्या माणसांप्रमाणेच नेमस्त, साधेसुधे होते व शेवटपर्यंत तसेच राहिले. सिनेमाचा खूप मोठा पसारा त्यांनी पाहिला. त्यात ते मजेने सामील झाले. लोकांना त्यांनी रिझवले. आपली सद्दी संपल्यावर शांतपणे बाजूला झाले. आज एक आठवडा सिनेमा थिएटरात चालला तरी तो यशस्वी मानला जातो. अशा काळात चाळीस वर्षे टिकून राहणाऱ्या या चिरतरुण ही-मॅनला कृषीवलच्या वतीने श्रध्दांजली.

विचार

# भारताचा संविधान दिवस



संजीव मोरे

२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करत असतांना प्रथम संविधान तयार होण्याची प्रक्रिया आपण थोडक्या समजून घेणे क्रमप्राप्त आहे. ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र देणेचे जाहीर केले नंतर भारताच्या स्वातंत्र्याच्या अखेर एक कॅबिनेट मिशन भारतामध्ये आले. त्या मिशनने काँग्रेस आणि मुस्लीम लिग बरोबर चर्चा केली. त्याचवेळी स्टॅफोर्ड क्रिप्सने भारताने घटना समिती तयारकरून भारताची स्वतंत्र घटना तयार करावे असे सूचित केले. त्याप्रमाणे भारताच्या प्रत्येक प्रांताच्या कायदे मंडळाकडून घटना समितीवर सभासद घेणेत आले. परंतु डॉ.बाबासाहेबांना कोणीही निवडून देऊ नका अशा प्रकारची भूमिका काँग्रेस पक्षाने घेतली होती. स्वातंत्र भारताच्या भावी जडणघडणीमध्ये दलितांचे हित काय असावे ते कशात आहे, त्यांच्या उध्दारासाठीच्या योजना कशा अंतर्भूत करता येतील हा ध्यास डॉ. आंबेडकरांना लागलेला होता. त्यासाठी घटना समितीमध्ये समावेश होणे किती आवश्यक आहे याची जाणीव डॉ. आंबेडकरांना तीव्रपणे झाली होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशन या पक्षाचा दारून पराभव झालेला होता. संपुर्ण भारतामधून बंगाल आणि मद्रासच्या विधानसभेत फक्त दोनच सभासद निवडून आले होते. डॉ. आंबेडकरांना मात्र कोणत्याही परिस्थितीत घटना समितीमध्ये सहभागी होणे बहुजनांच्या हितासाठी आवश्यक होते. डॉ.बाबासाहेबांच्या मनाची ही घालमेल जोगेंद्रनाथ मंडल यांनी जाणली होती म्हणून त्यांनी बाबासाहेबांना बंगालमधून निवडणूक लढविण्याची विनंती केली. मुस्लीम लिग आणि काँग्रेस पक्षातून निवडून आलेले व इतर अपक्ष यांच्या सहकार्याने डॉ. आंबेडकर, शरदचंद्र बोस यांचा पराभव करून घटना समितीवर निवडून आले व घटना समितीमध्ये सहभागी झाले. घटना समितीची स्थापना ६ डिसेंबर १९४६ रोजी झाली व पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. या बैठकीमध्ये पंडीत नेहरूंनी मांडलेल्या उद्दिष्टांच्या ठरावावर दि. १७ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. आंबेडकरांनी जे भाषण केले ते अत्यंत प्रभावी होते. त्या भाषणामुळे समितीतील प्रत्येक सदस्य डॉ. आंबेडकरांचा चाहता झाला व काँग्रेस पक्षाला डॉ. आंबेडकरांची घटनेच्या निर्मितीसाठी घटना समितीमध्ये सहभागी करून घ्यावे असे प्रकर्षाने वाटू लागले. डॉ. आंबेडकरांनी देखील स्वतःच्या प्रकृतीची पर्वा न करता देशहित लक्षात घेऊन सहकार्याची भूमिका घेतली.

डॉ. आंबेडकर विविध समित्यांवर काम करत असताना २३ जुलै १९४७ मध्ये भारत पाकिस्तान यांचे विभाजन झाले. त्यामुळे डॉ. आंबेडकर ज्या प्रांतामधून घटना समितीवर निवडून आले होते तो प्रांत पाकिस्तानच्या वाट्याला गेला. साहजिकच डॉ. आंबेडकरांचे सदस्यत्व संपुष्टात आले. परंतु डॉ. आंबेडकरांची घटना समितीला असणारी आवश्यकता त्यांनी पूर्वी विविध समित्यांमध्ये केलेले प्रभावीपणे काम देशाबद्दलचा त्यांचा दृष्टीकोन त्यांच्या जमेच्या बाजू काँग्रेस दुर्लक्षित करू शकत नव्हती. म्हणून डॉ. आंबेडकरांना पुन्हा निवडून आणणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत काँग्रेस गेली. योगायोगाने बॅ. एम. आर. जयकर व पंडीतजी यांचे मुस्लिम लिगच्या संदर्भात मतभेद झाल्यामुळे बॅ. जयकर यांनी घटना समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे मुंबई प्रांताची एक जागा रिक्त झाली होती. त्या रिक्त जागेवर डॉ. आंबेडकरांना बिनविरोध निवडून आणावे यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी अनुक्रमे ३० जून १९४७ आणि ४ जुलै १९४७ च्या पत्रानुसार मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बी. जे. खेर यांना सूचित केले. डॉ. आंबेडकरांबाबत अन्य कोणतेही कारण विचारात घेतले तरी (डॉ. आंबेडकरांचे काँग्रेस आणि गांधीजी यांचेशी असलेले तीव्र मतभेद) घटनापरिषदेतील आणि तिच्या विविध समित्यांमधील (घटना समितीच्या एकूण १८ समित्या होत्या पैकी १३ समित्यांवर डॉ. आंबेडकर काम करत होते.) डॉ. आंबेडकरांची काम गिरी इतकी उच्च दर्जाची आहे की, त्यामुळे त्यांच्या सेवेला आपण मुकू नये असे वाटते. डॉ. आंबेडकरांशी लाख प्रकारचे मतभेद असणारी लाखो माणसे असू शकतील परंतु डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल त्यांच्यातील भारताच्या भविष्याच्या तळमळीबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती डॉ. आंबेडकरांचे हेच गुण काँग्रेस दुर्लक्षित करु शकली नाही व घटनासमिती पासून त्यांना दूर करू शकली नाही.

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी घटना असून उत्कृष्ट राज्यघटना म्हणून जग तिच्याकडे पहाते. परंतु टिका करतांना टिकाकार म्हणतात की भारताची राज्यघटना तयार करतां फार मोठा कालावधी खर्ची पडलेला आहे. परंतु डॉ. आंबेडकर हे लोकशाहीवादी होते. घटना तयार करतांना केवळ समितीमधील सदस्यांची मते विचारात न घेता देशातील जनतेची राज्यघटनेबाबत मत काय आहेत हे देखील जाणून घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने त्यांनी जनतेच्या घटनेबाबत मत मागवली, सुचना मागवल्या त्यानुसार ७६२४ हरकती प्राप्त होऊन पैकी २४७३ सुचना जनतेच्या मान्य करून त्यांचा समावेश घटनेत करणते आला. घटनेचा कामकाजासाठी ११ अधिवेशने झ ली प्रत्येक अधिवेशनात चर्चा होत गेल्या त्यानुसार घटना तयार होत गेली आणि अशी अनेक कारणे घटना निर्मिती करतांना निर्माण होत गेली. या अशा वेळखाऊ प्रक्रियांमुळे सहाजिकच वेळ लागणार होताच याचे समर्थन डॉ. आंबेडकर करतात. घटनेच्या अनुषंगिक सांगायचे झाले तर संपूर्ण घटनेतील शब्दांची एकूण संख्या १,४६,३८५ आहे. एकूण पानांची संख्या २५१ एवढी आहे. घटनेच्या शेवटी २८४ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या संविधानाचे एकूण वजन ३२ किलोग्राम आहे. संविधान निर्मितीसाठी एकूण झ आलेला खर्च ६३,९६,७२९/- एवढा आहे ही घटना तयार करण्यासाठी लागलेला कालावधी २ वर्षे ११ महिने १८ दिवस एवढा आहे. भारतीय राज्य घटनेच्या विचार करता ही राज्यघटना डॉ. बाबसाहेब आंबेडकरांची सर्वोत्तम निर्मिती असून ती सामुहिक प्रयत्नांनी आकाराला आली म्हणून ती या देशाला मान्य झाली. महाडला मनुस्मृती जाळणाऱ्या एका दलिताच्या हातून हे महान कार्य पूर्णत्वास गेले ही नवी भिमस्मृती उदयाला आली हा बदलत्या काळाचा तेजस्वी अविष्कार आहे.

भारतीय संविधान भारताला लाभलेले एक वरदान असून त्यामुळे देश शांतता प्रस्थापित करण्यात यशस्वी झालेला आहे. भारतासह आशिया खंडातील जे देश स्वतंत्र झाले त्यांनी देखील लोकशाहीचा स्विकार केला. आज त्या देशात लोकशाहीची काय स्थिती आहे हे सर्वश्रुत आहे याचा विचार करता आपली लोकशाहीचे अत्यंत सुदृढ, लवचिक आणि देशहित जपणारी आहे याचे कारण या देशाचे भक्कम असे संविधान त्यामुळे आपल्या लोकशाहीचे महत्व अधोरेखित होते. जगाच्या दृष्टीने एवढी आदर्शवत असे संविधान असताना देखील काही कर्मठ वृत्तीचे लोक संविधानावर आपले तत्थहिन विचारांचे प्रदर्शन करतात. काही वर्षापूर्वी दिल्ली येथे एका मनुवादी वृत्तीने संविधानाची होळी केल्याचे आपणास आठवत असेल, तर काही राजकीय नेते आम्ही घटना बदलणेसाठीच सत्तेवर आलो आहोत असे जाहीर विधाने करतात. त्यांच्यावर काहीही कार्यवाही होत नाही हे या देशाचे आणि संविधानाचे दुर्दैव आहे हे अत्यंत वेदनादायी आणि व्यवस्थेचे हतबलतेचे लक्षण आहे. या देशातील काही मंडळी देशापेक्षा धर्मावर आणि धर्मापेक्षा कर्मकांडावर श्रध्दा बाळगणारे आहेत.

अशा कमकुवत मानसिकतेच्या महाभागांनी या देशाच्या सविधानाचा कधीही मनापासून स्विकार केलेला नाही ही बाब देशाला अत्यंत हानीकारक आणि एकात्मतेला तडा देणारी आहे. ही मानसिकता बदलणे संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे, सामाजिक एकात्मता, बंधुता, प्रेम या गोष्टी प्रत्येक भारतीयांचे मनात रूजवणे अत्यंत क्रमप्राप्त आहे. त्याशिवाय देश शांततेच्या मार्गाने मार्गक्रमण करूच शकणार नाही हे प्रत्येक सच्च्या भारतीयाच्या मनामध्ये रूजवणे आवश्यक आहे. प्रत्येकाने जेवढ्या लवकर हे समजून घेतले तेवढे या देशाच्या प्रगतीसाठी उन्नतीसाठी आवश्यक आहे. म्हणून सन २०१५ पासून डॉ आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून या देशाच्या संविधानाच्या प्रति जागरूकता निर्माण व्हावी, घटनेचे महत्व अधोरेखित व्हावे, घटनेचे पावित्र्य जपले जावे हा उद्देश लक्षात घेऊन शासनाने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा व्हावा असे स्पष्ट केले आहे. कारण हा दिवस आपल्या पवित्र संविधानाचा सन्मान करण्यासाठी प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देतो प्रेरित करतो. डॉ. बाबासाहेबांनी मोठ्या कष्टाने शरीर साथ देत नसताना फक्त देशाच्या हितासाठी आपल्या बुद्धीचातुर्याने लोकशाहीरूपी मंदिरात संविधानरूपी देवीची मोठ्या मनोभावे स्थापना केली आहे. त्या देवीचे पावित्र्य या देशातील प्रत्येक सच्च्या नागरिकाने प्रत्येक भारतीयाने पुजाऱ्याच्या भूमिकेतून जपले पाहिजे तरच आणि तरच आपल्या संविधानाचे खऱ्या अर्थाने रक्षण होईल आणि 'मेरा भारत महान' हा नारा केवळ नारा न राहता तो सत्यात उतरेल. शेवटी हेच म्हणावे लागेल आपले सर्व श्रेष्ठ आशास्थान प्रेरणास्थान आपले ''संविधान''

# भ्याड हल्ल्याच्या काळ्याकुट्ट आठवणी



राकेश लोहार

२६ नोव्हेंबर २००८... मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी करण्यात आलेल्या दहशतवादी हल्ल्याला १७ वर्षे पूर्ण होत आहेत. १७ वर्षांनंतरही दहशतवादाचे सावट कायम आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात एखाद्या शहरावर अतिरेक्यांनी अशा पद्धतीने केलेला हा पहिला हल्ला होता. समुद्रमार्गे मुंबई किनाऱ्यावर उतरत दहा पाकिस्तानी अतिरेक्यांनी पूर्ण मुंबईला वेठीस धरले होते. या दहशतवादी हल्ल्यामध्ये ३४ विदेशी नागरिकांसह एकूण १६६ निष्पापांना आपला जीव गमवावा लागला होता. तर, या हल्ल्यात ७०० हून अधिक जण जखमी झाले होते. मुंबई पोलीस आणि केंद्रीय जवानांनी हा हल्ला परतून लावला होता. यात ९ दहशतवाद्यांना कंठस्नान घालत अतिरेकी अजमल कसाब याला जिवंत पकडण्यात आले होते. पुढे कसाबला फासावर चढवण्यात तपास यंत्रणेला यश आले. मात्र, या हल्ल्यात १८ पोलीस जवानांना वीरमरण आले.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला हा भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा धक्का ठरला. आज या भ्याड हल्ल्याला १७ वर्षे पूर्ण झाली. या हल्ल्याच्या आठवणीने जिवाचा थरकाप उडतो. अनेक निरपराध लोकांचे जीव गेले, शेकडो जखमी झाले आणि संपूर्ण देशात दु:ख व संतापाचे वातावरण पसरले. पण, या भीषण घटनेने केवळ विनाशच आणला असे नाही; तर त्यातून समाज, सरकार आणि सुरक्षा यंत्रणेला अनेक महत्त्वाचे धडे मिळाले. या हल्ल्याने सर्वप्रथम हे दाखवून दिले की, राष्ट्रीय सुरक्षेबाबत सतत सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक शस्त्रांनी सज्ज दहशतवादी काही मिनिटांत किती मोठे नुकसान करू शकतात, हे जगाने पाहिले. त्यामुळे देशातील सुरक्षा व्यवस्थेला नवी दिशा मिळाली आणि त्वरित प्रतिसाद देण्यासाठी विशेष प्रशिक्षित दल, आधुनिक साधने आणि तंत्रज्ञान यांचे महत्त्व अधोरेखित झाले. यापुढे सुरक्षा कधीच ढिलाईची गोष्ट नसून एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, हे लोकांना उमगले.

या हल्ल्याने दुसरा मोठा धडा दिला तो म्हणजे प्रभावी गुप्तचर माहिती आणि निरीक्षण प्रणालीची गरज. जर दहशतवाद्यांची हालचाल, समुद्रमार्ग आणि त्यांचे संवाद वेळेवर ओळखले गेले असते, तर या हल्ल्याची तीव्रता कमी करता आली असती. त्यामुळे नंतर गुप्तचर विभागाचे जाळे, सायबर मॉनिटरिंग आणि तांत्रिक ट्रॅकिंग अधिक सक्षम केले गेले. तिसरा महत्त्वाचा धडा म्हणजे, संपूर्ण राष्ट्राने एकजुटीने संकटाचा सामना केला पाहिजे. २६/११ च्या काळात मुंबईकरांनी दाखवलेला संयम, शांतता आणि मदतभाव प्रेरणादायी ठरला. नागरिकांनी अफवांना बळी न पडता परस्परांना मदत केली, रक्तदान केले, अडकलेल्या लोकांना मार्गदर्शन केले. यामुळे संकटाच्या वेळी सामाजिक एकता किती महत्त्वाची असते, हे प्रकर्षाने समोर आले.

या हल्ल्याने आणखी एक कठोर सत्य दाखवून दिले की दहशतवादाचा धर्माशी, जातीशी किंवा राष्ट्रीयत्वाशी काहीही संबंध नसतो. दहशतवादी कोणत्याही धर्माचे प्रतिनिधित्व करत नाहीत; ते फक्त हिंसा आणि विनाश पसरवतात. बळी पडलेलेही सर्व समाजातील होते आणि मदत करण्यासाठी पुढे आलेलेही सर्वच धर्म आणि जातींचे होते. म्हणूनच मानवतेचा धर्म हा सर्वात मोठा आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या हल्ल्याने दिला. तसेच, या घटनेत शहीद झालेल्या पोलीस व सुरक्षा दलांनी दाखवलेले धैर्य एक वेगळाच धडा शिकवून गेले. संकट कितीही मोठे असले तरी कर्तव्य आणि देशसेवा यापुढे काहीही नाही. त्यांच्या बलिदानाने संपूर्ण राष्ट्राला दृढता आणि धैर्याचा अर्थ शिकवला.

हल्ल्यानंतर न्यायव्यवस्थेने जिवंत पकडलेल्या दहशतवादी कसाबला न्यायालयीन प्रक्रियेने शिक्षा दिली. यामुळे जगाला संदेश मिळाला की, भारत दहशतवादाविरोधात ठाम आहे आणि कायद्याच्या चौकटीत राहून गुन्ह्यांना शिक्षा देण्याची क्षमता त्याच्यात आहे. या प्रक्रियेने न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ झाला. शेवटी, २६/११ हल्ल्याने हेही अधोरेखित केले की, संकट कितीही मोठे असले तरी देश पुन्हा उभा राहू शकतो. मुंबईने दुसऱ्याच दिवशी आपली गती परत मिळवली, कामे सुरू झाली, लोकांनी धैर्याने जीवन पुढे नेले. ही जिद्द, हा आत्मविश्वास आणि ही न डगमगणारी वृत्ती हेच भारताचे खरे सामर्थ्य आहे.

एकूणच पाहता, २६/११ हल्ला ही जखम असूनही त्या जखमेने दिलेली शिकवण अत्यंत महत्त्वाची आहे. ती म्हणजे, सुरक्षा व्यवस्थेची गरज, गुप्तचरांची अचूकता, नागरिकांची एकता, धर्मनिरपेक्षता, शौर्याचा सन्मान आणि संकटातून उभे राहण्याची ताकद. हल्ला विसरला जाऊ नये, परंतु त्यातून शिकलेले धडे मात्र नेहमी लक्षात ठेवले पाहिजेत, कारण त्याच धड्यांमुळे पुढील पिढी अधिक सुरक्षित, सजग आणि जबाबदार राष्ट्र घडवू शकते.

लोकसंसद

## सनबर्न फेस्टिवल मुंबईत होणे अयोग्य!

आज देशाचे भविष्य असलेली युवा पिढी नशेच्या संकटामध्ये सापडलेली आहे. त्यातच अमली पदार्थांचे भयंकर संकट युवा पिढी समोर आहे, नव्हे ते प्रत्येकासमोरच आहे! कारण एका नशेच्या आहारी गेलेल्या व्यसनी युवकामुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाची सावली पडते. मुंबईमध्ये १९ ते २१ डिसेंबर २०२५ या काळात सन बर्न फेस्टिवल होणार आहे. या सनबर्नमुळे विदेशी संगीत, पॉप गायक, इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक फेस्टिवल; याच्या नावाखाली अमली पदार्थांचा सर्रास वापर होतो. अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे कितीतरी तरुण मृत पावल्याचे आपल्याला माहितही आहे! तरुणांना नशेमध्ये ओढणाऱ्या या अतिशय वाईट विकृतीला मुंबापुरीत किंवा आपल्या सर्व पवित्र भारतभूमीतच काही स्थान असू नये! – सौ. आदिती देखणे

## बॉलिवूडचा देखणा 'ग्रीक गॉड' कालवश

गेली सहा दशके आपल्या बहुआयामी अभिनयाने हिंदी चित्रपटसृष्टीचा पडदा गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या जाण्याने एका अभिनय संपन्न युगाची इतिश्री झाली. रांगड्या देखणेपणासाठी बॉलिवूडचा 'ग्रीक गॉड' आणि ही-मॅन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्मेंद्र यांनी १९६० साली 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत ३००हून अधिक चित्रपटात काम केले. 'फूल और पत्थर', अनुपमा, जीवन मृत्यु, यादों की बारात, प्रतिज्ञा, धरम-वीर 'शोले', 'चुपके चुपके', 'सत्यकाम', 'सीता और गीता' यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांनी त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. झिलमिल सिताराओं का आंगन होगा (जीवन मृत्यु, १९७०), पल पल दिल के पास (ब्लॅक मेल, १९७३), आज मौसम बडा बेईमान (लोफर, १९७३) ये दोस्ती हम नहीं तोडेंगे (शोले, १९७५) अशी असंख्य लोकप्रिय गाणी धर्मेंद्र यांच्यावर चित्रित झाली आहेत. खरे तर तो काळ, एकीकडे दिलीप कुमार, राज कपूर आणि देव आनंद या हिंदी चित्रपटसृष्टीतील तीन दिग्गजांनी व्यापलेला असतानाच दुसरीकडे पहिला सुपरस्टार म्हणून गणला गेलेला रोमँटिक हिरो राजेश खन्ना आणि त्यानंतर प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेणारा अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चन पडद्यावर अवतरला. अशावेळी त्या तगड्या स्पर्धेत टिकून राहून धर्मेंद्र यांनी आपल्या अष्टपैलू अभिनयाचा वेगळा ठसा उमटवला आणि आपले स्थान अधिक बळकट केले. त्यांना जीवन गौरवसहित अनेक पुरस्कार मिळाले. २०१२ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. धर्मेंद्र यांना भावपूर्ण आदरांजली! –प्रदीप अनुसया शंकर मोरे

दिनविशेष

# संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७६ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. २६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला. संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. **श्याम बसप्पा ठाणेदार**

पान १ वरून

## समुद्र सुरक्षित, रक्षक उपेक्षित

शस्त्रांचा साठा आढळून आला होता. अशा काळ्या घटनांनी रायगडमधील किनारे परिचित आहेत. रायगड जिल्ह्यातील किनारे सुरक्षित ठेवण्यासाठी पेणमधील दादर, ओएनजीसी पिरवाडी, रेवस जेट्टी, मांडवा परिसरातील आरसीएफची जुनी जेट्टी, मांडवा, नवगाव, अलिबाग, रेवदंडा, आग्राव, कोर्लई, बोर्ली मांडला, नांदगाव, एकदरा, राजपुरी, आंबेत, बागमांडला, मांदाड, शेखाडी, जीवना दिघी पॅसेंजर, दिघी पोर्ट अशा अनेक बंदरांवर सुरक्षा रक्षक रात्रीचा दिवस करून काम करीत आहेत.

समुद्रालगत फिरणाऱ्या संशयित बोटींवर लक्ष देऊन त्याची माहिती स्थानिक पोलिसांना देणे, खलाशी यांचे आधार कार्ड तपासून त्यांची नोंदणी करणे, मासेमारीला जाणाऱ्या बोटींना टोकन देणे, अशा अनेक प्रकारची कामे सुरक्षा रक्षक करीत आहेत. पोलिसांसह मत्स्य विभागाला मदतीचा हात देणाऱ्या सुरक्षा रक्षकांना चार महिन्यांचे मानधन मिळालेले नाही. ते जुलैपासून मानधनाच्या प्रतीक्षेत आहेत. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासह दिवाळीचा सणही मानधनाविनाच साजरा करण्याची वेळ त्यांच्यावर आली. मानधन नसल्याने या कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. याप्रकरणी मत्स्य विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील तसेच परवाना अधिकारी महादेव नांदुसकर यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

## शुक्रवारी 'सर्वोच्च' फैसला

हे न्यायालयाला ठरवू देऊ, असं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले. आम्ही अजूनही माहिती घेतो आहे. त्यामुळे सुनावणी एका दिवसानंतर ठेवता येईल का? अशी मागणी मेहता यांनी केली. यावर आज कुठंलही मत मांडत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं. यावर तुषार मेहता म्हणाले, निवडणुकात कशा घ्यायच्या? ओबीसी आरक्षण, प्रश्न कसा सोडवायचा याबाबत सविस्तर अहवाल सादर करायचा आहे. त्यामुळे शुक्रवारपर्यंत वेळ द्यावा, अशी मागणी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली.

पुढे किती ठिकाणी आरक्षणाचं उल्लंघन झालं आहे, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला. त्यावर १५७ ठिकाणी आरक्षणाचं उल्लंघन झालं आहे, असं निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आलं. त्यानंतर पुढील सुनावणी शुक्रवारी होईल, असं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट केलं..

महत्त्वाचे म्हणजे, यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आल्याबद्दल राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत. अशावेळी सर्वोच्च न्यायालयात नेमका काय निर्णय होतो? याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांवर गेल्या ८ वर्षांपासून प्रशासकराज आहे. पण, आता नगरपरिषद आणि नगरपंचायतीसाठी निवडणुकीचा धुरळा उडाला आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. पण, त्यांच्या या उत्साहावर विरजण पडण्याची शक्यता आहे. कारण, या निवडणुकीत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्याचे समोर आलं आहे. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेवरील मंगळवारची सुनावणी आता शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. अशावेळी न्यायालयात काय निर्णय होतो, यावर या निवडणुकांचे भवितव्य ठरणार आहे. न्यायालयाने आरक्षणाबाबत नवे आदेश दिले तर, या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. कारण, आयोगाला प्रभाग रचना, आरक्षण सोडतपासून ते नोटीफिकेशन काढण्यापर्यंत पुन्हा एकदा नव्याने तयारी करावी लागणार आहे. त्यामुळे शुक्रवारच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडे राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. महत्त्वाचे म्हणजे, राजकीय पक्षांबरोबर राज्य निवडणूक आयोगाचे याकडे लक्ष लागले आहे. त्यादृष्टीने निवडणूक आयोगाने तयारी सुरु केल्याची माहिती आहे.

न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत येईपर्यंत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि मनपा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## सागरी सुरक्षेवर 'इगल'ची नजर

भला मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. समुद्रकिनाऱ्याच्या सुरक्षेसाठी रायगड पोलीस दलामध्ये सागरी सुरक्षा शाखा ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. या सुरक्षा शाखेमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सागरी सुरक्षेवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते. रायगड पोलीस दलाच्या हद्दीत २८ पोलीस ठाणे आहेत. यापैकी १७ सागरी पोलीस ठाणे आहेत. त्यात खाडीलगतच्या नऊ व सागरी किनाऱ्यालगतच्या आठ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात १३० लँडिग पॉईंट आहेत.

जिल्ह्यातील सागरी सुरक्षा अधिक मजबूत व्हावी, यासाठी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून सागरी कबड्डी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. पोलीस आणि मच्छिमार यांच्यामध्ये एक विश्वासाचे नाते निर्माण व्हावे, सागरी सुरक्षा अधिक मजबूत व्हावी, यासाठी हा उपक्रम राबविला होता. सागरी सुरक्षेच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम जिल्ह्यात राबवित असताना, जिल्ह्यामध्ये गेल्या चार वर्षांपूर्वी रायगड पोलिसांनी एक अनोखा उपक्रम हाती घेतला. जिल्ह्यात मासेमारी करणाऱ्या बोटींची माहिती मिळावी, त्यात असलेल्या खलाशी व तांडेल यांची माहिती असावी, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. त्यासाठी 'ईगल आय ॲप' नावाच्या आधुनिक साधनाचा वापर करण्यात आला.

जिल्ह्यातील मासेमारी करणाऱ्या बोटींची माहिती संगणकाद्वारे घेण्यात आली. बोटीचे मालक, खलाशी, तांडेल यांची माहिती या ॲपमध्ये अपलोड करण्यात आली. प्रत्येक बोटीला 'ईगल ॲप' नावाचे बारकोड देण्यात आले. एकूण तीन हजारांहून अधिक बोटींना हे बारकोट पोलिसांमार्फत देण्यात आले आहे. मोबाईलच्या एका क्लिकवर बोटीची सर्व माहिती या क्यू आर कोडद्वारे उपलब्ध होण्यास मदत होत आहे. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा मजबूत करण्यासाठी राबविलेल्या उपक्रमामुळे ईगल आय ॲप सुरक्षेसाठी वरदान ठरत आहे. एका क्लिकवर सर्व माहिती सुरक्षा शाखेला प्राप्त होत आहे. समुद्रातील गैरप्रकार व सागरी मार्गाने होणाऱ्या दहशतवादी हल्ल्याला रोखण्यासाठी ईगलची मदत होत असल्याचे बोलले जात आहे.

**रायगड पोलिसांनी सागरी सुरक्षेसाठी एक चांगले पाऊल उचलले. बोटींची माहिती मिळण्यास त्याचा फायदा होत आहे. ईगल आय ॲप फायदेशीर आहे. अनेक बोटींना क्यू आर कोड देण्यात आला आहे.**

**– विजय गिदी,श्री महालक्ष्मी मच्छिमार सोसायटी राजपुरी, चेअरमन**

## मनुस्मृती जिवंत असल्याचा भास होतोय : उल्का महाजन

मनुस्मृती दहन १९२७ ला झाल्याखेरीज लोकशाही आणि स्वातंत्र्य देशवासियांना मिळणे दुरापास्त असल्याची जाणीव असल्यानेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री आणि शूद्र यांना हिनतेचे जीवन देणाऱ्या मनुस्मृतीचे दहन महाडच्या क्रांतीभूमीत केले. महाडचे तत्कालीन २३ वर्षीय अध्यक्ष सुरबानाना टिपणीस यांनीदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शहरातील पाणवठे खुले करून देण्यासाठी निमंत्रित केले होते. या क्रांतीभूमीतूनच समतेचा संगर सुरू होऊन देशव्यापी वातावरण निर्माण झाले. आणि, आता संविधान जाळण्यापर्यंत मजल जाऊनही कोणतीही कारवाई होत नाही पुन्हा मनुस्मृती आणण्याची भाषा सुरू झाली आहे. त्यामुळे आता महाडच्या क्रांती भूमीतून तरुणांनी केवळ समतेचाच नव्हे तर, लोकशाही आणि संविधान अबाधित ठेवण्यासाठी आपल्या आयुष्याची अनेक वर्षे सक्रिय ठेवण्याची गरज आहे, असे आवाहन केले.

याप्रसंगी कॉम्रेड धनाजी गुरव यांनी, संत स्वराज्य आणि संविधान हा शिवशंभू प्रतिष्ठानच्या चळवळीचा उद्देश असून, सध्याच्या तरुणांना यापासून दूर करणाऱ्या वाईट शक्तींना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात तरुणांना लोकशाही मार्गाकडे ओढण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. मनुस्मृतीने महिला आणि शूद्र यांचे अधिकार डावलून ही समाज व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला; ती मनुस्मृती छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वात आधी झिडकारली होती. असे सांगून तत्कालीन समाज व्यवस्थेने त्यांना शूद्र म्हणून राज्याभिषेक करण्यास नकार दिला असतानादेखील महाराज सम्राट झाले. त्यांनी रयतेचा राज्य आणले. स्वतःच्या आई जिजाऊ माँसाहेबांना सती जाण्यापासून परावृत्त केले आणि महाराज मोहिमेवर असताना स्वराज्याचा कारभार पाहण्याचे काम राजमाता जिजाऊ माँसाहेबांनी केले. यातूनच महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर येथील ताराराणी यांनी प्रेरणा घेतली आणि पेशव्यांना विरोध केला स्वतःचे संस्थान उभे केले. यामागे देशातील संत परंपरा ही प्रोत्साहित करणारी ठरली. आज कुठेतरी जाती आणि धार्मिक वादाच्या आडून संत विचार कुंठीत केले जात आहेत; स्वराज्य देखील धर्म जातीमध्ये अडकविले जात आहे. या सगळ्यातून प्रभावी लोकशाही आणि जगमान्य भारतीय संविधान टिकवण्याची आपणावर जबाबदारी आहे असे सांगून प्रमाणे रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक आहे त्याप्रमाणे रायगडावर स्वराज्याचे छत्रपती संभाजी महाराजांचेदेखील स्मारक होण्याची आवश्यकता आहे आणि त्यातूनच भावी पिढीला प्रेरणा मिळणार आहे म्हणून तिच्यावरदेखील घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या तरुण, महिला, आबालवृद्धांनी क्रांतीभूमीवर गर्दी केली होती. याप्रसंगी विद्रोही प्रकाशनाची दोन पुस्तके भाई सुभाष पाटील यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश जाधव यांनी केले, तर आभार दर्शन प्रा. दीपक क्षीरसागर यांनी केले. प्रारंभी गंगाधर साळवी यांनी संविधान, लोकशाही, संत विचार, छत्रपती शिवाजी महाराज यांचे आज्ञापत्र विषयांवर आधारित पोवाडे सादर केले.

क्रांतीभूमीवर राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, चवदार तळे तसेच अन्य भागांमध्ये उपस्थितांची पदयात्रा संविधान अमृत महोत्सवाच्या घोषणांनी काढण्यात आली.

यानंतर सर्व संविधानप्रेमी पाचाड येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या समाधीस्थळी जाऊन मानवंदना देण्यासाठी उपस्थित राहिले.

## मतदारांनी निर्भीडपणे मतदान करावे : संजय दराडे

पोलीस बंदोबस्त, कायदा-सुव्यवस्था माहितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

यावेळी संजय दराडे यांनी सांगितले की, मतदानाच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे. संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष फोर्स तैनात करण्यात आला आहे.

पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, तसेच जनतेने निर्भीडपणे, कोणत्याही दबावाशिवाय मतदान करावे, असे आवानही केले. यावेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल व अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी तसेच अन्य पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## लहान मासे पकडल्यास थेट कारवाई

मत्स्यव्यवसाय विभागाकडून याबाबत जनजागृती करण्यात येत असली, तरीही मोठ्या प्रमाणात माशांची पिल्ले पकडली जातात. अनेकदा करदी, जवळा, मांदेली, कोळंबी, टेंडली या प्रजातीच्या लहान व प्रौढ माशांची मासेमारी करताना लहान जाळ्यांचा वापर केला जातो. माशांची लहान पिल्ले चुकून जाळ्यात सापडतात. मात्र, या नियमामुळे अकारण कारवाईची भीती मच्छिमारांमध्ये निर्माण झाली आहे. माशांच्या पिल्लांच्या अनियंत्रित मासेमारी थांबवण्यासाठी शासनाने काही कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईचा हेतू योग्य असला तरी सर्व मच्छिमारांना एकाच चौकटीत बसवून केलेली ही कृती अन्यायकारक ठरेल. माशांच्या पिल्लांच्या संरक्षणासाठी अवैध मासेमारी केंद्रांवर ठोस आणि कठोर कारवाई करणे आवश्यक आहे, असे मत कोळी बांधवांनी व्यक्त केले.

जागृतीचा अभाव

बेसुमार मासेमारी रोखण्यासाठी माशांच्या ५४ प्रजातींचे आकारमान निश्चित करण्याबाबत नोव्हेंबर २०२३ मध्ये मत्स्यव्यवसाय विभागाकडून आदेश काढण्यात आले. त्यात कारवाईबाबत कोणतेही स्पष्टीकरण नव्हते. मात्र, ऑक्टोबर २०२५ मध्ये कारवाईबाबत निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अनेक मच्छिमारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, शासनातर्फे माशांचे आकारमान व कारवाईबाबत मासेमारांमध्ये जनजागृती केली जात आहे. त्याअंतर्गत मच्छिमारांच्या कार्यशाळादेखील घेण्यात येत आहेत.

मासेमारीच्या दोन पद्धती

समुद्रात दोन प्रकारच्या मासेमारी पद्धती प्रचलित आहेत. तरती आणि बुडी तरती पद्धतीत जाळे समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगतात आणि त्यात माशांची पिल्ले मोठ्या प्रमाणात अडकतात. बुडी पद्धतीत जाळे खोल समुद्रात बुडवले जातात. त्यात मोठे मासे अधिक सापडतात. तरती मासेमारीमुळे सर्वाधिक प्रमाणात पिल्लांची हानी होते.

## फाईब्रो कास्ट कंपनीला भीषण आग

घेण्यात आली. अखेर शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र यंत्रसामग्री, तयार साहित्य व कच्चा माल जळून कंपनीचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, याबाबत तळोजा पोलीस तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाने स्वतंत्र तपास सुरू केला आहे. विजेच्या शॉर्टसर्किटची शक्यता नाकारण्यात आलेली नाही. दरम्यान, तळोजा एमआयडीसी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून आग लागण्याच्या घटनांमध्ये सातत्य आल्याने औद्योगिक सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.२५३/२०२५**

पुष्पा मारुती म्हसकर
रा.रिळे ता. माणगाव जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
रिळे, ग्रामपंचायत देगाव
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. महादू धाकल्या म्हसकर यांचा जन्म/मृत्यू मौजे रिळे ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१३-०३-१९९७ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २८-०७-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू रिळे येथे दि. १३-०३-१९९७ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.१३-०३-१९९७ रोजी रिळे ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- २५-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

### ग्रुप ग्रामपंचायत नागांव

मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन - ४०२ २०४

जावक क्र.- १७८५ — दिनांक २४-११-२०२५

**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत नागांव ता.अलिबाग, जि. रायगड कडून १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील प्रमाणे साहित्य पुरवठ्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | काम पूर्ण करण्याची मुदत | स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीतील साईडपट्टी साफसफाई करणे. | २,९९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २ | पावसाळ्यापूर्वी गटार साफसफाई करणे. | २,९९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ३ | वैयक्तिक व सार्वजनिक कचरापेटी खरेदी करणे | १,१६,२९९/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ४ | घंटागाडी देखभाल दुरुस्ती करणे. | १,००,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ५ | ग्रामपंचायत हदीतिल साफसफाई करणे | २,०७,९००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ६ | ट्रक्टर ट्रोली खरेदी करणे | ६,५२,४४२/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ७ | घंटागाडी इंधन खरेदी | १,००,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ८ | जलशुधीकरण साहित्य (औषध) खरेदी करणे (मेडीक्लोर) | १,००,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ९ | TCL पावडर खरेदी करणे | १,००,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १० | ग्रामपंचायत हदीत नवीन पाईपलाईन टाकणे | २,९९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| ११ | ग्रामपंचायत हद्दीतील पाईपलाईन दुरुस्ती करणे | २,९९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १२ | बोरिंग दुरुस्ती किंवा नवीन बोरिंग मारणे पाणीपुरवठा उपाययोजना | २,०७,९००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १३ | पऱ्हेगल्ली येथे नवीन पाईप लाईन टाकणे | २,५०,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १४ | चापड आळी येथे नवीन पाईपलाईन टाकणे | २,१९,७४१/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १५ | नागांव बंदर येथे पाईप लाईन टाकणे | २,९९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १६ | शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप करणे | ८६,३००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १७ | ग्रामपंचायत समाजमंदिर दुरुस्ती करणे किव्हा स्ट्रीट लाईट सोलर बसविणे | २,४९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १८ | पाल्हे येथे नवीन पाईपलाईन टाकणे | २,५६,२८०/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| १९ | ग्रामपंचायत समाजमंदिर फर्निचर खरेदी करणे | १,००,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २० | सार्वजनिक व्यायमशाळेसाठी साहित्य खरेदी करणे | २,९९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २१ | महिला व्यायामशाळेसाठी साहित्य खरेदी करणे | १,५०,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २२ | महिला व युवतींना व्यावसायिक प्रशिक्षण व अर्थसहाय्य करणे | २,४९,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २३ | अंगणवाडी प्राथमिक शाळा डीजिटल करणे | ७३,७८०/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २४ | वैयक्तिक कचराकुंडी वाटप करणे | ३,६६,३२९/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |
| २५ | आर.ओ.प्लांट येथे सोलर सिस्टम बसविणे | ३,००,०००/- | ६ महिने | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती**

१) निविदा/दरपत्रके मोहोरबंद पाकीटामध्ये मा. सरपंच ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि. २५/११/२०२५ ते दि. ०१/१२/२०२५ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १० ते १ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.

२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारणेचा किंवा नाकारणेवा अधिकार खाली सही करणाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

३) कोणत्याही नामंजूर निविदा/दरपत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

५) या कामासाठी आलेल्या निविदा दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा दरपत्रके किंवा सर्व निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. आणि निविदा दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दरपत्रके दि. ०४/१२/२०२५ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यलयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**सही/-**

**सौ. श्वेता संजय कदम**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**
**ता. अलिबाग, जि. रायगड**

**सौ. हर्षदा निखील मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**

### महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145)222167

**निविदा सूचना क्रमांक ३७ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी कृतकंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणीवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे अंबर्ले, ता. माणगांव, जि. रायगड वडाचाकोंड परिसर सुशोभिकरण करणे. | ८०१८००९/- | ८१०००/- | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ |
| २ | आंबेत येथील शासकीय विश्रामगृहाच्या आवारात अंतर्गत रस्ता करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे ता. माणगाव, जि.रायगड. | १६४२०२४/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ३ | मौजे नवघर उसरघरवाडी ग्रा.पं.नवघर ता. माणगाव येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. | १२२६६४९/- | १३०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा |
| ४ | मौजे निळगुण ग्रा.पं.निळगुण ता. माणगाव, येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. | ८१५०९५/- | ९०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात |
| ५ | न्हावे ता. माणगाव येथे अंगणवाडी इमारत बांधणे, जि. रायगड | ८४६३११/- | ९०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात |
| ६ | मौजे पाचोळे ग्रा.पं.पाचोळे ता. माणगाव येथे सामाजिक सभागृह बांधणे | ८१२२४९/- | ९०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २६-११-२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०३-१२-२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन द्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.)विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक ०५-१२-२०२५ वेळ १०.०० वाजता |

टिप : परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी यावरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४३९९**
**दिनांक :- २४-११-२०२५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

### जाहीर निविदा सूचना

**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक, ता. रोहा.**

**निविदा सूचना** — दिनांक :- २५/११/२०२५

ग्रुप ग्राम पंचायत आरेबुद्रुक सन २०२५-२६ खालीली विकास कामे जनसुविधा विशेष अनुदाने (२५१५ १३८१) आयोग ग्रामपंचायत स्तर निधीतून हाती घेतले आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रकात मा. कार्यकारी अभियंता, मा. उपभियांता (बांधकाम) उपविभाग रोहा, मा. उपभियांता ग्रा.पा.पु. (बांधकाम) उपविभाग रोहा यांनी तांत्रिक मंजुरी दिली असून सदर कामा करणेसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर संस्था यांजकडून टक्केवारी दराची लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा २६/११/२०२५ ते ०३/१२/२०२५ मागवण्यात येत आहेत. सदर निविदा कायालयीन कामकाजाच्या दिवस सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत कालयायात समक्ष सादर करावयाच्या आहेत.

| अ क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी | ठेकेदार वर्ग | निविदा सदर करणेची वेळ: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% घसारा रक्कम | कामपूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरे बुद्रुक अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ३०००००/- | २००/- | नोंदणीकृत | ०३/१२/२०२५ | सायं. ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ३००० | २ महिने |
| २ | आरेखुर्द अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ३०००००/- | २००/- | नोंदणीकृत | ०३/१२/२०२५ | सायं. ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ३००० | २ महिने |
| ३ | कुंभोशी अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ३०००००/- | २००/- | नोंदणीकृत | ०३/१२/२०२५ | सायं. ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ३००० | २ महिने |

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यलयीन वेळेस पहावयास मिळतील आवश्यक फी भरून त्याची प्रत उपलब्ध केले जातील.
२) प्राप्त निविदा दि. ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांचे उघडण्यात येतील.
३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपने रजिस्ट्रेशन दाखले हे सत्य प्रत केलेले असावे.
४) कोणताही एक अथवा अनेक निदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.
५) देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकरणाची कपात केली जाईल पंचायत समिती रोहा यांचे कडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीने अधिकारी सदस्य याचे मार्गदर्शन व देखरेखीखालील सदर काम करणे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६) काम अंतिमरीत्या पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यानंतर देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदार यांनी करणेची असून त्यानंतर सुरक्षा अनामत परत केल जाईल.
७) कामाची बिले ग्रामपंचायत जनसुविधा विशेष अनुदाने (२५१५ १३८१) योजना उपलब्ध निधी नुसार अदा करणेत येईल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशीर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
९) निविदा किमत नापर्तावा समजावा १० निविदा मंजूर केल्यास १००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करून द्यावा लागले.

सही /-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक**
**ता. रोहा जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक**
**ता. रोहा जि. रायगड**

## माणगाव शहरात वाहतूक कोंडीची समस्या

# कोंडीमुळे हाणामारीचे प्रकार

■ **सामान्य नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**




**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहराची शांतता, शिस्त व सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन आज वाहतूक कोंडीमुळे पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर रोज सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड वाहनांची रांग लागलेली दिसतात. कोंडी इतकी तीव्र झाली आहे की, काही ठिकाणी तर वाद, धक्काबुक्की आणि हाणामारीचे प्रकारही घडताना दिसत आहेत. परिणामी नागरिक, महिला, विद्यार्थी आणि रोजंदारीवर जाणारे कामगार मोठ्या संकटात सापडले आहेत.

मुंबई-गोवा महामार्गाची अपूर्णता समस्येला मुख्य कारण आहे, शहरातून जाणारा मुंबई-गोवा महामार्ग अद्याप पूर्ण न झाल्यामुळे महामार्गावरील वाहतूक संपूर्ण शहरातच अडकून पडते. अरुंद रस्ता, उभ्या असलेल्या गाड्या आणि सततचा जड वाहनांचा ताण यामुळे छोटे-मोठे अपघात तर रोजचेच झाले आहेत. त्यातच वाहतूक वळवताना संपूर्ण शहर जाम होते. मोरबा रोड, कचेरी रोड, निजामपूर चौक हे शहरातील 'हॉटस्पॉट' ठरत आ-हेत. मोरबा रोड, कचेरी रोड आणि निजामपूर चौक या भागांमध्ये वाहतूक कोंडीचे प्रमाण दररोज भीषण असते. रिक्षांची गर्दी, बसचा ताण, चारचाकी-दुचाकींची स्पर्धा आणि चौकातील अपुरे नागरिक नियोजनामुळे नागरिकांना पंधरा मिनिटांचा प्रवासही अवघड होतो. त्यामुळे पोलीस यंत्रणेवर मोठा ताण पडत आहे. वाहतूक पोलीस कर्मचारी अत्यंत कमी असल्याने परिस्थिती हाताळताना त्यांच्यावर प्रचंड ताण येत आहे. एका कर्मचाऱ्याला दोन ते तीन चौकांवर लक्ष ठेवावे लागत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवणे अशक्यप्राय झाले आहे. या कारणामुळे अपघात झाल्यावर किंवा वाद झाल्यास तात्काळ नियंत्रण करणेही कठीण होत आहे. अचानक हाणामारीचे प्रकार नागरिक भयभीत होत आहेत. गर्दीत अडकलेली वाहने, पुढे जाण्याची घाई, समोरच्याचे ऐकू न घेणे या सगळ्याचा परिणाम म्हणजे काही ठिकाणी धक्काबुक्की, वाद आणि हाणामारीचे प्रसंग घडत आहेत. या घटनांमुळे महिला व ज्येष्ठ नागरिक अधिकच घाबरले असून, सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी त्वरित उपाययोजना आवश्यक नागरिकांचा आग्रह आहे.

शहरातील नागरिक व व्यावसायिकांनी प्रशासनाकडे खालील मागण्या जोरदारपणे मांडल्या आहेत. वाहतूक पोलिसांचा तातडीने बंदोबस्त वाढवावा. महामार्गाचे अपूर्ण काम जलदगतीने पूर्ण करावे. चौकांमध्ये सिग्नल व्यवस्था व सीसीटीव्ही बसवावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### अतिक्रमण हटवा

मोरबा रोड, कचेरी रोड व निजामपूर चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करावे. माणगाव शहराचा दैनंदिन श्वास गुदमरत चालला आहे. वाहतूक कोंडीचे सर्पिल जाळे वाढत चालले असून, प्रशासनाने त्वरित पावले उचलली नाहीत तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.



## खोपोलीत पोलिसांचे संचलन

**| खोपोली | प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद निवडणूक २०२५ शांततामय, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त पार पाडण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासन या निवडणुकीत अधिक कठोर आणि सक्रिय भूमिकेत उतरले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल व खोपोली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी शहरातील सर्व प्रभागांना भेट देत निवडणूक यंत्रणेची पाहणी केली. २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षेतील त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश डॉ. विशाल नेहुल यांनी दिले.

मतदान केंद्रांची रचना, सीसीटीव्ही नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन, असामाजिक घटकांवरील कारवाई तसेच निवडणूकपूर्व आणि निवडणुकीनंतर ईव्हीएम मशीनची सुरक्षा यांचा त्यांनी काटेकोर आढावा घेतला. डॉ. नेहुल यांच्या सूचनांनुसार खोपोलीमध्ये पोलीस दलाने दंगा काबू योजना राबवून तसेच रूट मार्च काढून निवडणूकपूर्व वातावरणात कायदा-सुव्यवस्था टिकवून ठेवण्याची तयारी पूर्ण केली आहे.

## निवडक



### अनिरुद्ध उपासना केंद्रात रक्तदान

**कर्जत :** सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जततर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कर्जत-खालापुर तालुक्यातील ५२९ वे रक्तदान शिबीर होते. अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जत,आवळस, कोंदिवडे, कडाव, दहिवली, नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने व घाटकोपर येथील समर्पण रक्त केंद्र यांच्या सहकार्याने श्री शनी मंदिराच्या रविकिरण सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. प्रशांत सदावर्ते, जयवंत म्हसे, विनोद पांडे, अमिर मणियार, मंगेश गावकर, शिरीष दिघे, नितिन देशमुख, गणेश राऊत, सुभाष पाटील, हेमंत सुरावकर, सुनिल शिंदे, सुनिल पवार, समीर कारूळकर, विमल डागा, मनिषा देशमुख, रिना शिंदे, सुरेखा प्रधान, निकिता देशमुख, लता कुलकर्णी, प्रतिभा देशमुख, कविता शिंदे, नीला घेणारे, उषा दिवेकर, स्वरूपा बदले आदी उपस्थित होते.



### कर्जत पोलिसांचे रूट मार्च

**कर्जत :** कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्जत पोलीस ठाण्याच्यावतीने कर्जत नगरपरिषद हद्दीत रूट मार्च काढण्यात आला होता सोमवार (दि.२४) नोव्हेंबर रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने पोलीस मैदान कर्जत येथे दंगा काबू योजना रंगीत तालीम घेण्यात आली. त्यानंतर नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्या करिता तसेच नगरपरिषद निवडणूक भयमुक्त वाता-वरणात शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने कर्जत पोलीस ठाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, कर्जत नगरपरिषद, पाटील आळी, डेक्कन जिमखाना, जकात नाका, कर्जत मुख्य बाजारपेठ, श्री कपालेश्वर मंदिर, महावीर पेठ, आमराई नाका ते कर्जत पोलीस ठाणे असा रूटमार्च काढण्यात आला होता. सदर दंगा काबू योजना व रूट मार्चकरिता कर्जत पोलीस ठाणे कडील ६ अधिकारी १५ पोलीस अंमलदार, तसेच आरसीपी प्लाटून कर्जतचे १ अधिकारी १८ पोलीस अंमलदार उपस्थित होते.



### संत गाडगे महाराज समितीची भेट

**तळा :** तळा तालुक्यातील समुद्रकिनारी वसलेले वाशी हवेली हे गाव गेल्या काही वर्षांत स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि डिजिटल प्रशासनातील उल्लेखनीय कार्यामुळे राज्यासह राष्ट्रीय पातळीवर विशेषत्व-ाने झळकले आहे. याच पार्श्वभूमीवर कोकण विभागीय संत गाडगे महाराज अभियान समितीच्या मान्यवर पथकाने वाशी हवेली ग्रामपंचायतीला भेट देत गावाच्या सर्वांगीण प्रगतीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. समितीने गावातील कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत ग्रामपंचायतीचे मनःपूर्वक कौतुक केले.मान्यवरांमध्ये प्रमुख उपस्थिती प्रदीप घोरपडे सहाय्यक आयुक्त, कोकण भवन, गणेश गांधळे लघुलेखक कोकण भवन, जयवंत गायकवाड जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद अलिबाग, दत्ता नाईक, रविकिरण गायकवाड,माजी सरपंच जगन्नाथ तांडेल यांसह पंचायत समिती तळा, तसेच विविध समाजबंधुत्वाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कापडी पिशव्यांचे वाटप

**| रसायनी | प्रतिनिधी |**

पर्यावरण संवर्धनाचा महत्त्व-पूर्ण संदेश देत रसायनी पाताळगंगा येथील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व प्रमोल केमिकल लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने खैरणे एमआयडीसीत प्लास्टिकबंदी जनजागृती मोहीम राबवून दोन हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत दोन हजालर कापडी बॅग नागरिक व कामगार वर्गामध्ये वाटण्यात आल्या. प्लास्टिकचा वाढता वापर थांबविणे, पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आणि स्वच्छ पर्यावरण निर्माण करणे हा उद्देश होता. कार्यक्रमास शोभा शेट्टी, मनोज काकड, अरुण जाधव, आदी उपस्थित होते.

## पीएनपीच्या विद्यार्थ्यांचे वक्तृत्व स्पर्धेत यश




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान (वेश्वी) महाविद्यालयातील विद्यार्थी पंकज पांडुळे आणि ध्रु राऊत या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील विविध महाविद्यालया मार्फत घेण्यात येणाऱ्या अनेक वक्तृत्व स्पर्धेमध्ये महाविद्यालयाला यश मिळवून दिले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखाताई पाटील यांनी पंकज पांडुळे आणि ध्रु राऊत या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कला शाखाप्रमुख प्रा. नम्रता पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. मिलिंद घाडगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. रुपाली पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी पंकज आणि ध्रु या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल कौतुक करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## उरण तालुक्यात शेतकऱ्यांचा
# भाजीपाला उत्पादन वाढीकडे कल



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील जमिनीला सोन्याचे भाव प्राप्त झाले आहेत. शेती करण्यापेक्षा या जागेवर एखाद्या व्यवसाय अथवा प्रकल्प उभारण्याचा मानस शेतकऱ्यांचा अधिक दिसत आहे. त्यामुळे उरण तालुक्यात भातशेती लागवडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. परंतु, तालुक्यातील चिरनेरच्या पूर्व भागात भाजीपाल्यासह कडधान्य पिके आधिक घेतली जातात. सध्याच्या घडीला घेतलेल्या भाजीपाल्याचे उत्पादन कडधान्यापेक्षा जास्त घेतले जात आहे.

आदिवासी ठाकूर जमात मोठ्या प्रमाणावर भाजीपाल्याचे पीक घेत आहेत. कमी वेळ व कमी कष्टात जास्त नफा देणारी भाजीपाल्याची पिके असल्याने, भाजीपाला लागवडीतून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळत आहे.

शेतकरी भाजीपाल्यासह वाल व चवळीची लागवड मोठ्या प्रमाणात करत असल्याचे चित्र येथे पहावयास मिळत आहे. तालुक्यात पडवळ, कारली, दुधी, घोसाळी, मिरची, वांगी, टोमॅटो, तोंडली अशा भाजीपाल्यांची लागवड शेतकरी करत आहेत.

तालुक्यातील शेतकऱ्यांना पनवेल येथे बाजारपेठ उपलब्ध असल्याने भाजीपाल्याचे पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला दिसून येत आहे.

> शेतकऱ्यांनी कडधान्यामध्ये वाल, चवळी, मूग, मसूर आदी कडधान्याची पेरणी केली आहे. तसेच चिरनेर येथील श्री महागणपती सेंद्रिय शेती गटाला पेरणीसाठी फुले विक्रांत व्हरायटीचे हरभऱ्याचे ४१० किलो बियाणे दिले आहे. जेणेकरून शेतकऱ्यांचा कडधान्य पीक घेण्याकडे कल वाढेल. त्याचबरोबर तालुक्यातील कडधान्याचे क्षेत्र वाढावे, यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे.
> – सुषमा सुभाष अंबुलगेकर, कृषी सहाय्यक अधिकारी उरण

> पनवेल येथे बाजारपेठ उपलब्ध असल्याने कडधान्यांच्या तुलनेत भाजीपाला पिकविण्याकडे शेतकऱ्यांचा मोठा कल वाढला आहे.
> –कृष्णा अनंत म्हात्रे.
> शेतकरी, चिरनेर

## सर एस एस विद्यालयात आठवणींचा स्मृती गंध

■ **१९७५ च्या बॅच सुवर्ण महोत्सवी वर्षात एकत्र**



**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

इयत्ता अकरावी एस एस सी जुन्या अभ्यासक्रमाच्या सन १९७५ च्या बॅचच्या सुमारे ५४ विद्यार्थ्यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षात शाळेत एकत्र येत स्नेहमेळाव्याने आठवणींचा स्मृतीगंध पुन्हा एकदा दरवळला आहे.

अकरावी शालांत परीक्षा जुनी एस एस सी अभ्यासक्रम सन १९७५ मुरुडच्या सर एस एस. हायस्कूलमधील बॅचच्या विद्यार्थ्यांनी शाळेचा निरोप घेतला त्याला चालू वर्षी पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रविवारी शाळेत सुवर्ण महोत्सवी सोहळा आयोजित केला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तथा सदर बॅचमधील एक विद्यार्थी उदय गद्रे होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. याप्रसंगी शाळेतील दिवंगत शिक्षक, कर्मचारी व सहकारी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन पवार यांनी केले उपस्थितांचे स्वागत उदय गद्रे, उल्हास चौलकर, गणेश सुकाळे, विश्वनाथ रणदिवे, अरुणा जोशी, मोहन पाटील, उदय चौलकर, संतोष लखमदे आदींच्या हस्ते करण्यात आले. चंद्रशेखर सतविडकर, दिप्ती विभाकर दांडेकर, पांडुरंग आगरकर, गणेश सुकाळे आदींनी शाळेतील जुन्या आठवणींना यावेळी उजाळा दिला.

यावेळी जंजिरा विद्या मंडळाचे संचालक उदय दांडेकर, संचालिका सुशिला म्हात्रे, माजी शिक्षक प्रकाश मसाल, दिलीप दांडेकर, सरोज राणे, भास्कर मोरे, सचिव उल्हास गुंजाळ,लेखनिक राहुल वर्तक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय खोत यांनी केले.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549
- Driver पाहिजे ८०८७५७२७४७
- नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वतःची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७
- पाहिजेत- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी - १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह. विविध शाखांसाठी Home Revise Education Pvt.Ltd. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors / Sales Executive-20, Franchise-20, Telecaller-03. **Contact :** 8419940004 / 9372071769
- नागाव येथे घरी राहून कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल. सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555
- विकणे आहे - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


**कर्जतमध्ये आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन | चंद्रकला दासरी-संगीता पाटील यांनी गायली गीते**

# आगरी शालेत कार्यशाळेत 'लग्ना'तील धवले सादर




**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ येथे आयोजित धवला कार्यशाळेत चंद्रकला दासरी आणि संगीता पाटील यांनी तब्बल तीन दिवसांचा लग्न सोहळा धवला गीतांमधून सादर केला. आगरी शाला उपक्रमात धवला कार्यशाळेत सहभागी महिलांसमोर लग्न सोहळ्यातील धवला गीते सादर केली.

आगरी ग्रंथालय चळवळ आणि कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्या माध्यमातून एक दिवसीय आगरी शाला उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी आयोजित आगरी धवला कार्यशाळेत चंद्रकला दासरी आणि संगीता पाटील सहभागी झाल्या होत्या. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे संचलन दया नाईक यांनी केले. आगरी समाजात तीन दिवसांचा लग्न सोहळा असतो आणि त्यात पहिल्या दिवशी उटणे लावणे, त्यानंतर हळद समारंभ, तिसऱ्या दिवशी पहाटे लॉन उतरण्यापासून लग्न सोहळ्यानंतर नवरी पाच परतणी विधी साजरे होत असतात. या सर्व विधीमधील कोणकोणत्या प्रकारची धवले असतात. त्याची माहिती चंद्रकला दासरी आणि संगीता पाटील यांनी सादर करून दिली. लग्न सोहळ्यातील नवरा आणि नवरी यांना उटणे लावण्याचा कार्यक्रम असतो त्या कार्यक्रमात होणारे विधीचे प्रसंगी कोणते धवले गाण सादर होते, ते गीत संगीता पाटील यांनी सादर केले.

हळद समारंभ ज्यावेळी सुरू होतो त्यावेळी नवरा किंवा नवरी गावातील मंदिरात जाऊन येत असताना आणि हळद लावली जात असतानाचे धवला गीत चंद्रकला दासरी यांनी सादर केली.

सायंकाळी होणारे मांडव स्थापना आणि त्यानंतर देव बसवण्याचे कार्यक्रम या विधी प्रसंगी होणारे धवले तसेच लग्नाच्या दिवशी पहाटेच्या वेळी उतरले जाणारे लॉन आणि नंतर नवरा किंवा नवरीची तसेच वरमाईची होणारी एकत्रित अंघोळीपासून बाशिंग बांधण्याचा कार्यक्रम या सर्व विधी प्रसंगी सादर केले जाणारे धवले यांचे गायन या कार्यशाळेत सादर करण्यात आले.

### महिलांनी घेतला नाचण्याचा आनंद

लग्न सोहळा पूर्ण झाल्यावर नवरी आपल्या नवऱ्याच्या घरी जाण्यासाठी निघताना गायले जाणारे धवले आणि पाच परतणं आदी सर्व प्रकाराची धवले या धवला कार्यशाळेत सादर करण्यात आली. अनेक धवले गाणी सादर होत असताना महिलांनी नाचण्याचा आनंद देखील घेतला.

## उरण महाविद्यालयात
# संविधान जागर

**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय संविधान जागर अभियान कार्यशाळेचे आयोजन केले गेले. भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षापूर्वी निमित्ताने विद्यार्थी प्रबोधन कार्यक्रमांतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले गेले. कार्यशाळेस वसंत मोहिते, रमेश गोंधळी, डॉ. पराग कारुळकर, डॉ. हनुमंत जगताप, प्रा. रियाज पठाण तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. राजीव चिनुभाई शाह व इतर, रा. डी १०४, विशाल अपार्टमेंट, एम व्ही रोड, अंधेरी ईस्ट, मुंबई यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे नागेवाडी, ता.कर्जत, जि.रायगड | ४४/६ | १०.०८.०० | ५.४६ |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे खरेदीबाबत दिनांक १०/१०/२०२५ रोजी दै. कृषीवल या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली होती परंतु दिनांक १०/१०/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर नोटीसमध्ये वर्णन केलेला व्यवहार हा जमीन मालक श्री.राजीव चिनुभाई शाह व इतर यांनी रदद केलेला आहे याबाबत माहिती दिलेली आहे.

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. २६.११.२०२५

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा.शॉप नं.२, पाल टॉवर, भिसेगाव,
ता.कर्जत, जि.रायगड. मो.९३०७८८५७११

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मौजे बोरगाव, ता.कर्जत जि.रायगड**

| मालकांचे नाव | स.नं/हि.नं | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.रामचंद्र हिरू राणे | २३/१ | एकूण क्षेत्र ०-६६-४० हे.आर.पॉ.यापैकी विकत देणार यांचे अविभक्त हिस्स्याचे विक्री क्षेत्र ००-१६-६० हे.आर.पॉ. | ५-६३ |
| | २५/५ | एकूण क्षेत्र २-५५-०० हे.आर.पॉ. यापैकी विकत देणार यांचे अविभक्त हिस्स्याचे विक्री क्षेत्र ००-६३-७५ हे.आर.पॉ. | १-९५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदापेत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हकरत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि.२६/११/२०२५

**ॲड.संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९४०३६४७९५३

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.३३३/२०२५

जयराम रावजी पाटील मयत तर्फे वारस
१ श्री.योगेश जयराम ठोंबरे उर्फ पाटील — अपिलार्थी
२ श्रीम.कुसूम जयराम ठोंबरे उर्फ पाटील
रा. भिलवले, ता. खालापूर, जि. रायगड
३ श्रीम.मंगल कमलाकर गडगे
रा.खरवई, ता.अंबरनाथ, जि. ठाणे

विरुद्ध

१ श्री पंढरीनाथ उर्फ पांडूरंग तुकाराम ठोंबरे उर्फ पाटील उर्फ पंढरीनाथ उर्फ पांडूरंग जयतु ठोंबरे उर्फ पाटील
रा. भिलवले, ता. खालापूर, जि. रायगड
२ श्री. भरतभाई नरोत्तमभाई नरसाना
३ श्रीम.वर्षा भरत नरसाना
रा.५७, आर बी मेहता रोड, ४ वृदांवन, घाटकोपर, नवी मुंबई - ४०००७७
४ श्री.मदनभाई नथुभाई पटेल
रा. सुर्यप्रकाश बिल्डींग, ३ रा मजला, बाबुलनाथ रोड, मुंबई
५ श्रीम. सोनल यतीन पाठक
रा.सी.२७, पटेल पार्क सोसायटी, मिलिटरी कॅम्प समोर, सांताक्रुझ पुर्व - ४०००२९
६ मे.नील लॅण्ड प्रा. लि. तर्फे संचालक श्री.प्रकाशचंद्र शुक्ला तर्फे अखत्यारी श्री. संतोष गजानन नेरुरकर
रा.द्रोणागिरी हाऊसिंग कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. जी एच १०, फ्लॅट नं. ४, तळमजला, सेक्टर ३०, पो. बोकडवीरा, ता. उरण, नवी मुंबई - ४०० ७०२ — उत्तरार्थी
७ श्रीम. बिंदू श्रीकांत झवेरी
रा.३१, उषकिरण, चार्मीअल रोड, मुंबई-२६
८ मारुती तुकाराम ठोंबरे मयत तर्फे वारस
८/१ श्रीम. विमल गोविंद बोराडे
रा. हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड
८/२ श्रीम. लताबाई काशिनाथ थोरवे
रा. कडाव, पो. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड
८/३ श्री. वसंत मारुती ठोंबरे उर्फ पाटील
८/४ श्री.दिलीप मारुती ठोंबरे उर्फ पाटील
रा. भिलवले, ता. खालापुर, जि. रायगड
९ श्री. बबन तुकाराम ठोंबरे
रा. भिलवले, ता. खालापुर, जि. रायगड
१० श्रीम. शांताबाई सखाराम बोराडे
११ श्री. महादेव विठ्ठल राणे
नामदेव विठ्ठल राणे (मयत तर्फे वारस अ.क्र. १६ ते १९)
१२ श्री.राम विठ्ठल राणे
१३ श्री.रमेश विठ्ठल राणे
१४ श्री. सुरेश विठ्ठल राणे
१५ श्री. मनोहर विठ्ठल राणे
१६ श्रीम.ताराबाई नामदेव राणे
१७ श्री.प्रमोद नामदेव राणे
१८ श्री.प्रविण नामदेव राणे
१९ श्रीम.मेघा नरेश बोराडे
अ. क्र. १० ते १९ रा. हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड
२० उपविभागीय अधिकारी कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे भिलवले, ता. खालापूर, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. ४९/१ फ क्षेत्र ०-८४-३ हे. आर. आकार ९.५४, सर्व्हे नं. हिस्सा नं. ५४/अ १ क्षेत्र १-०३-० हे. आर. आकार १.३१, सर्व्हे नं./हिस्सा नं. ५४/ब २ क्षेत्र ०-०८-० हे.आर. आकार ०.११, सर्व्हे नं./हिस्सा नं. ६५/२ अ क्षेत्र ०-२३-४ हे. आर. आकार ३.७७ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडील आरटीएस अपील क्र. ५१/२०२४, दि. ०३/०४/२०२५ मधील आदेशाविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. १२/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वत: अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/११/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

## राजकीय पक्ष नोंदणीबाबत जाहीर सूचना

मी अर्जदार श्री.सुधाकर परशुराम घारे या जाहीर सुचनेद्वारे असे घोषित करतो कि, कर्जत खालापूर परिवर्तन विकास आघाडी या नावाने राजकीय पक्ष नोंदणीसाठी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे आम्ही अर्ज केला आहे.

या पक्षाचे मुख्य कार्यालय सर्वे ८/अ १ नं शिवसृष्टी बिल्डींग, मधील ए विंग, ब्लॉक नं २०७ दुसरा मजला, आमराई मु. पो. ता. कर्जत जि. रायगड या ठिकाणी असेल.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' या आदेशानुसार पक्षाच्या नोंदणीसाठी अर्ज केला आहे. या राजकीय पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी खालीलप्रमाणे आहेत:

अध्यक्ष : श्री. सुधाकर परशुराम घारे
सचिव : श्री. केतन मोरेश्वर बेलोसे
कोषाध्यक्ष : श्री. मधुकर परशुराम घारे

जर कोणाला कर्जत खालापूर परिवर्तन विकास आघाडी या राजकीय पक्षाच्या नोंदणीबाबत आक्षेप असल्यास, तो १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात 'सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०००३२ यांच्याकडे परस्पर नोंदवावा. त्यात आपला संपर्काचा अचूक पत्ता, दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मौजे बलीवरे, ता.कर्जत जि.रायगड**

| मालकांचे नाव | स.नं/हि.नं | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.नामदेव कृष्णा फोपे. | ३०/७ | खाता.क्र.९५ मधील एकूण क्षेत्र १-०७-०० हे.आर.पॉ.यापैकी विकत घेतलले क्षेत्र ००-६७-०० हे.आर.पॉ. | ०-९७ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदापेत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हकरत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि.२६/११/२०२५

**ॲड.संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या सामाईक जमिन मिळकतीतील ज्योती किरण चोणकर यांचा असणारा अविभक्त हिस्सा त्यांच्याकडुन खरेदी करण्याचे माझे अशिलांनी ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड | १६३/१ | ०-१६-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-१८-०० | २.५० |

**सदर सामाईक जमिन मिळकतीतील ज्योती किरण चोणकर यांचा असणारा अविभक्त हिस्सा हा या नोटीसीचा विषय आहे.**

तरी वर नमूद जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २४/११/२०२५,

**ॲड. गीता सं. पवार**
श्रुती सारंग सहकारी सोसायटी, युनियन बॅंकेसमोर ब्राम्हण आळी, ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, १) श्री. कुणाल प्रकाश भटटे व २) श्रीम.विदया प्रकाश भटटे यांच्या मालकीची मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्यांच्याकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे व त्या संबंधी उभयतांत वाटाघाटी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| सासवणे, | ३३२/ब/३ | ०-३९-४० पो.ख. ०-०३-६० ०-४३-०० | ८.९४ |
| पैकी ० हेक्टर २० आर एवढी मिळकत | | | |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २५/११/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-नांदाईपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनांच्या मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नांदाईपाडा ता.अलिबाग | १०२ | जिरायत ०-२१-८० पो.ख. ०-००-५० एकुण ०-२२-३० | ५.२५ |
| | १०३ | जिरायत ०-२७-१० पो.ख.०-००-५० एकुण ०-२७-६० | ३.७० |

वर वर्णन केलेली गट नं.१०२ चे संपुर्ण क्षेत्र आणि गट नं. १०३ या जमिन मिळकती पैकी गीता मरझश मानेक्शना यांचे नावे असलेले ०-२२-३० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेल्या मिळकती या विद्यमान मालक गीता मरझश मानेक्शना, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवंसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - २५/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे घोटे, ता. पेण, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिनेश गुलाबचंद बाफणा आणि सोहनराज भुरालाल बाफणा यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, विकसनाचा हक्क, अदलाबदल, वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर प्रमाणित कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतींवरील तथाकथीत हक्क सोडून दिले आहेत आणि मिळकतीवर विद्यमान मालकांव्यतिरीक्त अन्य कोणाचाही कसलाही मालकीहक्क, अधिकार नाही आणि सदरहू मिळकती निर्वेध आहेत असे समजून सदर मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, सर्वांस कळावे.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे घोटे, ता. पेण, जि. रायगड येथील ग्राम महसुल अधिकारी सजा वाशिवली यांचे हद्दीतील

| गट नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३० | २-३७-०० | १.१९ |

अलिबाग
दिनांक :-२६/११/२०२५

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
पत्ता: 'गुरूकृपा', महर्षी कर्वे रोड, अलिबाग अर्बन बँकचे शेजारी, मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की मौजे हुमगाव, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलानी तिचे विद्यमान मालक श्रीम. विनुता सतिशचंद्र कुलकर्णी व श्री. सतिशचंद्र रामनाथ कुलकर्णी यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २२ | ६ | ०.३२.९० पैकी ०-१६-०० गुंठे मिळकती बाबत | ४.०० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार, विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती हरकती आमचे आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २६/११/२०२५

**ॲड. प्रदिप मोतीराम सुर्वे**
ए २०२ स्वप्ननगरी को. ऑप. हौ.
सोसायटी, मुद्रे खुर्द, कर्जत रायगड
फोन. नं. २२०१२६/९८५०१३५६५९

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - सालवड, ता- कर्जत, जि - रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. बाळाराम शंकर जाधव व श्रीमती सीमा संतोष सारंग उर्फ सीमा अशोक सुरोशे यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणेः

| सर्व्हे. नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २८ | ५/अ | ०.५०.०० पैकी लिहून देणार यांच्या मालकिचे व ताबेकब्जा वहीवाटीचे खाते. नं.३९९ चे क्षेत्र ०.२७.०० | ०.६८ ०.३९ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बॅंक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: २६/११/२०२५

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ताः नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे दुरटोली, ता.रोहा, जि. रायगड येथिल .......**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| प्रितम नारायण सातार्डेकर, रेखा सुहास बोरोले, स्नेहल अतुल चौधरी, श्रद्धा अभिषेक महाले, सौरभ सुहास बोरोले | ६६४ | वरकस ०७-१६-०० पो.ख.००-४७-८० एकुण ०७-६३-८० पैकी क्षेत्र लिहून देणार यांचे ४-८०-० | ५.८७ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. २५/११/२०२५

सही/-
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता.रोहा,
जि. रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे- कार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कार्ले ता.अलिबाग | ३८५ | वरकस १-४५-०० पो.ख.०-०९-०० एकुण १-५४-०० | २.३१ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. शिरिष पद्माकर लेले, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - २५/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ३११, एकूण क्षेत्र ०-९६-२० हे. आर., आकार १८.५६ रू. पैसे या मिळकतीतील अविभक्त हिश्याचे, ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक सुनिल मनोहर परब, सुचिता सुभाष धुरी, सुभाष मनोहर परब व सुगंध मनोहर परब यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २५/११/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-पवेळे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ४६, एकूण क्षेत्र ०-२५-०० हे.आर., आकार ०.५३ रू. पै. ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक मंगेश लक्ष्मण कावजी, महेश लक्ष्मण कावजी व तेजस्वीता अशोक कावजी यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २५/११/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचा बोलणी विद्यमान मालक यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| चिंचवली ता.अलिबाग | १७/२ | ०-६८-२० पो.ख ०-०५-२० एकुण ०-७३-८० पैकी ०-५५-०० | १५.४३ | राजेंद्र जगन्नाथ वर्तक व इतर |

वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी अविभाज्य हिस्सा १) राजेंद्र जगन्नाथ वर्तक यांचे क्षेत्र ०-२४-५० हे. आर. २) जगतकुमार सहदेव वर्तक व इतर यांचे क्षेत्र ०-२४-५० हे. आर. ३) रमेश नामदेव वर्त व इतर यांचे क्षेत्र ०-०६-०० हे. आर. असे एकुण क्षेत्र ०-५५-०० हे.आर. या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. पुनित रविंद्र पाटील,**
मु.पो. हाशिवरे
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ८१४९५१६०३५

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव

**मु. पो. नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड, पिन - ४०२ २०४**

जावक क्र. - १७५० | दिनांक - २५/११/२०२५

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हित संबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हित संबंधांच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत नागांवकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र | गावाचे नाव | घर क्र. | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | नागांव | ४२७ | राजेंद्र चक्रधर ढापरे | प्रसाद प्रकाश धुरी |

सही/-
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत नागाव


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धा

# भारत विश्वविजेता

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

**भारतीय महिला संघाने सलग दुसरा कबड्डी विश्वचषक जिंकला आहे. अंतिम सामन्यात भारताने चायनीज तैपेईचा ३५-२८ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या छत्तीसगडच्या रेडर संजू देवीला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून निवडण्यात आले.ढाका येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात संघ सुरुवातीपासूनच पूर्णपणे वर्चस्व गाजवताना दिसला. भारताने २०१२ मध्ये इराणचा पराभव करून पहिल्यांदा विश्वचषक जिंकला होता. विशेष म्हणजे, संघाने २०१२ आणि २०२५ या दोन्ही विश्वचषक हंगामात आपले सर्व १२ सामने जिंकले आहेत.**

## ■ अंतिम फेरीत चिनी तैपेईला हरवले
## ■ संघाने स्पर्धेत सर्व सामने जिंकले




ढाका येथील शहीद सुहारावर्दी इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या सामन्यात टॉस चायनीज तैपेईने जिंकला आणि भारताला पहिल्या रेडची संधी मिळाली. संजू देवीने सुरुवातीच्या रेडमध्येच संघाला आघाडी मिळवून दिली. तैपेईने बोनस घेऊन प्रत्युत्तर दिले, पण पूनम आणि सोनालीच्या टॅकल्समुळे भारताची पकड आणखी मजबूत झाली.संजूने सुरुवातीच्या मिनिटांतच तीन गुणांची आणखी एक दमदार रेड केली. तैपेईच्या येन चियाओ-वेनने दोन गुण घेऊन स्कोअर ७-७ असा बरोबरीत आणला. त्यानंतर सुपर टॅकलमुळे तैपेई ९-७ ने पुढेही गेली.

१२व्या मिनिटात संजूने चार खेळाडूंना बाद करून सामन्याचे चित्र बदलले आणि भारताने १३-१२ अशी आघाडी घेतली. तैपेईच्या ह्वांग सु-चिनने फरक कमी ठेवण्याचा प्रयत्न केला, पण संजूच्या दोन गुणांच्या रेडने आणि त्यानंतरच्या ऑल आऊटने भारताला १७-१४ अशी आघाडी मिळवून दिली. हाफ टाइमपर्यंत भारत २०-१६ ने पुढे होता.दुसऱ्या हाफची सुरुवात तैपेईने बोनस पॉइंटने केली, पण पुष्पाच्या तीन गुणांच्या रेडने भारताची आघाडी पुन्हा वाढवली. तैपेईने रेड आणि टॅकलने पुनरागमनाचा प्रयत्न केला आणि स्कोअर २५-२२ पर्यंत आणला, पण भारताच्या संतुलित रेडिंग आणि मजबूत डिफेन्सने त्यांना पुढे जाऊ दिले नाही.शेवटच्या चार मिनिटांत तैपेईपेने सुपर टॅकल करून फरक ३०-२६ पर्यंत नक्कीच कमी केला, पण भारताने पुन्हा सामन्यावर पकड मजबूत करत आणखी एकदा ऑलआउट केले. निर्धारित वेळेनंतर भारत ३५-२८ ने विजयी ठरला.

चीनी तैपेईविरुद्ध भारताचा हा सलग दुसरा विजय आहे. २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत संघाने २६-२५ ने विजय मिळवला होता. त्याच स्पर्धेतील गट सामन्यात दोन्ही संघ ३४-३४ ने बरोबरीत राहिले होते.भारतीय संघाने गट फेरीपासून अंतिम फेरीपर्यंत आपले सर्व सामने दमदार पद्धतीने जिंकले. १८ नोव्हेंबर रोजी भारताने थायलंडला ६५-२० ने हरवून स्पर्धेची शानदार सुरुवात केली. त्यानंतर १९ नोव्हेंबर रोजी बांगलादेशला ४३-१८ ने, २० नोव्हेंबर रोजी जर्मनीला ६३-२२ ने आणि २१ नोव्हेंबर रोजी युगांडाला ५१-१६ ने पराभूत केले.उपांत्य फेरीत भारताने इराणला ३३-२१ ने हरवले आणि अंतिम फेरीत चीनी तैपेईवर ३५-२८ च्या विजयासह सलग दुसरे विश्वचषक विजेतेपद पटकावले.

# उरणमधील आर्यनची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्याचा जलतरणपटू आर्यन विरेश मोडखरकर याने युनिव्हर्सिटी निवड चाचणीत उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. उरण तालुक्यातून इंटरस्कुल तसेच इंटर युनिव्हर्सिटी या दोन्ही पातळ्यांवर राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड होणारा आर्यन हा पहिला जलतरणपटू ठरला आहे. आर्यनने यापूर्वी विविध स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करत स्वतःला सतत सिद्ध केले आहे.



सातत्याने सराव करत आर्यनने अनेक स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवले आणि याच जोरावर त्याने प्रथम इंटरस्कुल राष्ट्रीय पातळी गाठली. त्यानंतर युनिव्हर्सिटी निवड प्रक्रियेत उत्कृष्ट प्रदर्शन करून त्याने राष्ट्रीय संघात स्थान मिळवले.

आर्यन सध्या बीएससी आयटी (दुसरे वर्ष) शिकत आहे. १५ ते १७ सप्टेंबरदरम्यान डोंबिवलीतील पलावा सिटी जलतरण तलाव येथे झालेल्या युनिव्हर्सिटी निवड चाचणीत त्याने राष्ट्रीय स्पर्धेत आपले स्थान पक्के केले.

राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धा १८ ते २३ डिसेंबर दरम्यान चेन्नई येथील डॉ. टी. आर. परिवेंद्र अक्वाटिक कॉम्प्लेक्स येथे होणार आहेत. महाराष्ट्रातून निवडलेल्या १० मुली आणि १० मुलांच्या संघात आर्यनची निवड झाली असून, तो ५० मीटर बॅकस्ट्रोक आणि ५० मीटर बटरफ्लाय या जलतरण प्रकारत राज्याचे नेतृत्व करणार आहे.

# गोव्यात रंगणार पहिली लिजेंड्स प्रो टी -२० लीग

**। पणजी । वृत्तसंस्था ।**

शिखर धवन, हरभजन सिंह, शेन वॉटसन आणि डेल स्टेन यांसारखे तडफदार दिग्गज समूहाद्वारे प्रमोट केलेल्या लिजेंड्स प्रो टी-२० लीग स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

या लीगचा पहिला सीझन गोव्यात २६ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान रंगणार असून, पहिल्या सीजनमध्ये सहा फ्रँचायझी संघ आणि ९० दिग्गज खेळाडूंचा सहभाग असेल. नव्या इतिहासाची सुरुवात करणारी ही स्पर्धा नव्याने उद्घाटन केलेल्या वर्ना येथील १९१९ स्पोर्ट्झ क्रिकेट स्टेडियममध्ये आयोजित केली जाणार आहे.

या लीगमध्ये रोमांचक सामने, संस्मरणीय क्षण आणि दर्जेदार क्रिकेटची हमी आहे. खरोखरच ही स्पर्धा उत्सुकतेने पाहण्यासारखी आहे. लवकरच संघांची नावे जाहीर होणार आहेत.

# निवडक

## कुमार गट अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**मुंबई :** ठाणे शहर विरुद्ध मुंबई उपनगर पूर्व, पुणे ग्रामीण विरुद्ध नाशिक शहर या मुलांच्या, तर पुणे ग्रामीण विरुद्ध धुळे, पिंपरी चिंचवड विरुद्ध सातारा या मुलींच्या सामन्याने ५२व्या कुमार, कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होईल. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान तसेच महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. २५ नोव्हेंबर२०२५ रोजी सायंकाळी ४-०० वा. या स्पर्धेला सुरुवात होईल. मुलांच्या अ, क, फ गटात, तर मुलींच्या क, ड, इ गटात बाद फेरी गाठण्याची चुरस होण्याची शक्यता वाटते. यंदा पुण्यात सामने असताना पुणेकरांना पहिल्या चार संघात स्थान मिळविण्याची संधी अधिक आहे. या स्पर्धेची गटवारी आज राज्य संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी सर्व प्रसार माध्यमांकरिता एका पत्रकाद्वारे जाहीर केली.

## कर्णबधिरांच्या ऑलिंपिकमध्ये प्रांजलीला सुवर्णपदक

**सातारा :** टोकियो येथे सुरू असलेल्या २५ व्या कर्णबधिरांच्या ऑलिंपिक स्पर्धेत साताऱ्यातील प्रांजली प्रशांत धुमाळ हिने महिलांच्या २५ मीटर स्पोर्टस् पिस्तूल प्रकारात देशाला सुवर्णपदक मिळवून दिले. तिचे हे वैयक्तिक दुसरे



सुवर्णपदक आणि स्पर्धेतील तिसरे पदक ठरले आहे..भारताच्या प्रांजलीने अंतिम फेरीत ३४ गुण प्राप्त करून सुवर्णपदकाची कामगिरी फत्ते केली. युक्रेनच्या हॅलिना मोसिनाने ३२ गुणांसह रौप्यपदक, तर जिवोन जिओनने ३० गुणांसह कांस्यपदक मिळविले. प्रांजलीने यापूर्वी १० मीटर एअर पिस्तूल मिश्र प्रकारात अभिनव देशवालसह सुवर्णपदक जिंकले होते. .पात्रता फेरीत प्रांजलीची कामगिरी सरस ठरली. तिने जागतिक कर्णबधिर पात्रता विक्रम आणि कर्णबधिर ऑलिंपिक स्पर्धेतील विक्रमही मोडला. तिने ५७३- १४ गुणांचा शूटिंग केला आणि गेल्या वर्षी हॅनोव्हर येथे झालेल्या जागतिक कर्णबधिर नेमबाजी स्पर्धेत तिचा स्वतःचा विश्वविक्रम मोडला. या स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी १६ पदके जिंकली आहेत.

## विंडीज विरूद्धच्या पहिल्या कसोटीसाठी न्यूझीलंड संघ जाहीर

**नवी दिल्ली :** वेस्ट इंडिज क्रिकेट टीम सध्या न्यूझीलंड दौऱ्यावर आहे. न्यूझीलंडने मायदेशातील ५ सामन्यांच्या टी २० मालिकेत पाहुण्या वेस्ट इंडिजला ३-१ अशा एकतर्फी फरकाने पराभूत केलं. त्यानंतर उभयसंघात ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवण्यात आली. विंडीजला वनडे सीरिजमध्ये विजयाचं खातंही उघडता आलं नाही. न्यूझीलंडने विंडीजचा ३-० अशा एकतर्फी फरकाने धुव्वा उडवला. त्यानंतर आता न्यूझीलंडचा विंडीजला कसोटी मालिकेतही सुपडा साफ करण्याचा प्रयत्न असणार आहे. तर दुसऱ्या बाजूला वेस्ट इंडिजचा या मालिकेत विजय मिळवून दौऱ्याचा शेवट गोड करण्याचा प्रयत्न असणार आहे.उभयसंघात २ ते २२ डिसेंबर दरम्यान एकूण ३ कसोटी सामने खेळवण्यात येणार आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने पहिल्या कसोटी सामन्यासाठी १४ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने सोशल मीडियावरुन याबाबतची माहिती दिली आहे.टॉम लॅथम हा न्यूझीलंडचं पहिल्या कसोटीत नेतृत्व करणार आहे. तर अनुभवी फलंदाज आणि माजी कर्णधार केन विलियमसन याचं कसोटी संघात कमबॅक झालं आहे. उभयसंघातील पहिला सामना हा २ ते ६ डिसेंबर दरम्यान ख्राईस्टचर्च इथे खेळवण्यात येणार आहे. केनचं दुखापतीनंतर न्यूझीलंड संघात कमबॅक झालं आहे. केनला प्लेइंग ईलेव्हनमध्ये संधी मिळाल्यास तो खेळताना दिसणार आहे.

# चॅम्पियन चषकावर 'आशीर्वाद यंग स्टार'ची बाजी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील रावढळ येथील आर. सी. सी. अ या संघानी भव्यदिव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा सत्संग मैदान खारघर येथे रावढळ चॅम्पियन चषकाचे आयोजन करण्यात आले होते.या एकदिवसीय ओव्हरआर्म सामन्यात तालुका महाड ग्रामीण असोसिएशन मर्यादित ३२ संघानी क्रिकेट स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेला प्रमुख मान्यवर माजी जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे, रोहिदास आंबवले, समाजसेवक संदीप खिडबिडे, ग्रामपंचायत सरपंच नामदेव रेशिम, माजी मुंबई अध्यक्ष अनंत मांडवकर, विनोद जाधव यांच्यासह अनेकांनी स्पर्धेला भेट दिली तर स्पर्धा



यशस्वी करण्यासाठी कर्णधार हरिष राजमाने, बबलू मांडवकर, शैलेश मांडवकर, राजन मांडवकर आदींनी स्पर्धेसाठी संपूर्ण खेळाडू युवा कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी प्रचंड मेहनत घेतली.

अंत्यत चुरशीच्या व अटीतटीच्या सामन्यात चषकांचे प्रथम क्रमांकाचे मानकरी आशीर्वाद यंग स्टार तुडील, तर द्वितीय क्रमांकाचे विजेता जय हनुमान प्रतिष्ठान खुटिल, तृतीय पारितोषिक भवानी नडगांव अ संघ, चतुर्थ क्रमांक जननी सोमजाई क्रिकेट क्लब यांनी नाव कोरले, तसेच उत्कृष्ट फलंदाज स्वप्नील पार्टे, उत्कृष्ट गोलंदाज विवेक किजबिले, मालिकावीर नारायण उमासरे किताब पटकावला, सदर विजेता संघाला पारितोषिकाच्या स्वरूपात रोख रक्कम व आकर्षक चषक संघाला मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

# गौतमच्या निर्णयांमुळे भारतीय संघाची अवस्था 'गंभीर'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

सलग होणाऱ्या भारताच्या या पराभवानंतर प्रशिक्षक गौतम गंभीरच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. अनेकांकडून त्याच्यावर टीका केली जाते आहे. भारतीय संघाची अशी अवस्था बघता अनेकांनी गौतम गंभीरची तुलना ग्रेग चॅपल यांच्याशी केली आहे.

गुवाहाटीच्या बरसापारा स्टेडियमवर सुरु असलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४८९ धावांचा डोंगर उभारला. मात्र त्यानंतर फलंदाजीसाठी आलेला भारतीय संघ २०१ धावांतच गारद झाला. भारताकडून यशस्वी जयसवाल ने ५८ तर वॉशिंगटन सुंदरने ४८ धावांची खेळी केली. याशिवाय एकाही फलंदाज मोठी धावसंख्या करू शकला नाही.

भारतीय संघाच्या या प्रदर्शनानंतर आता गौतमच्या गंभीर रणनीतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. वारंवार बदलणारी बॅटिंग ऑर्डर, अनियंत्रित रोटेशन आणि खेळपट्टीवर आधारित प्रयोग यामुळे चाहत्यांमध्ये नाराजी आहे. गंभीर खेळाडूंना त्यांच्या नैसर्गिक क्रमांकावर खेळूच देत नाही, अशी टीका काही माजी खेळाडूंनी केली आहे..खरं तर गेल्या वर्षी न्यूझीलंडविरुद्धच्या व्हाइटवॉशनंतर भारतीय संघाची अवस्था अधिकच गंभीर झाली आहे. गौतमने प्रशिक्षक पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर भारताने एकूण १८ कसोटी सामने खेळले आहेत. त्यापैकी सात सामन्यात विजय तर नऊ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. याशिवाय दोन कसोटी सामने अनिर्णित राहिले आहेत. अशातच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दुसऱ्या कसोटी पराभव झाल्यास भारतावर आणखी एका व्हाइटवॉशची नामुष्की ओढवणार आहे. दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताचा पराभव झाल्यास भारत वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२७ साठी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.

भारतीय संघाच्या या कामगिरीनंतर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेकांना ग्रेग चॅपेलचा काळ आठवला आहे.

## श्रीकांत, प्रणॉयच्या कामगिरीकडे लक्ष

**। लखनौ । वृत्तसंस्था ।**

सुरू होणाऱ्या सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत किदाम्बी श्रीकांत आणि एच. एस. प्रणॉय यांच्यावर मुख्य लक्ष केंद्रित असेल. या दिग्गज खेळाडूंना युवा खेळाडूंकडून कडवे आव्हान मिळणार का, याची उत्सुकता असेल. माजी विजेत्या श्रीकांतला मलेशिया मास्टर्समध्ये उपविजेतेपदासह जवळपास सूर सापडला होता. त्याच्याकडे असणार आहे. प्रणॉयही पुन्हा एकदा यश खेचून आणण्याच्या निर्धाराने कोर्टवर उतरेल. पाचवा मानांकित श्रीकांत मेईराबा लुआंग मैसनाम विरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल, तर तिसऱ्या मानांकित प्रणॉयसमोर पहिल्या फेरीत कविन थंगमचे आव्हान असेल.

# तंदुरुस्तीवर अधिक मेहनत गरजेची!

## भारतीय बॅडमिंटनपटूंबाबत सायना नेहवालचा सल्ला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनच्या व्यग्र कार्यक्रमाला सामोरे जाताना सातत्याने यश मिळविण्यासाठी भारतीय खेळाडूंनी शारीरिकदृष्ट्या कणखर असणे गरजेचे आहे. त्यांनी तंदुरुस्तीवर अधिक मेहनत घ्यायला हवी, असे मत ऑलिम्पिक पदकविजेती माजी बॅडमिंटनपटू सायना नेहवालने व्यक्त केले.

सध्याच्या खेळाडूंमध्ये दुखापतींचे प्रमाण वाढले असून ही नक्कीच चिंताजनक बाब असल्याचे सायनाने नमूद केले. त्याच वेळी नव्या दमाच्या महिला बॅडमिंटनपटूंमध्ये आक्रमकतेची कमतरता जाणवते, असेही सायना म्हणाली.

अलीकडच्या काळात आपल्या बॅडमिंटनपटूंना फारसे यश मिळवता आलेले नाही. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडी, तसेच एकेरीत लक्ष्य सेन आणि पीव्ही सिंधू यांनी कामगिरीत सातत्य राखायला हवे. तसेच नव्या दमाच्या खेळाडूंनी पुढे येणे आणि आपली छाप पाडणेही भारतीय बॅडमिंटनच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे सायनाने नमूद केले.



खेळाडूंनी बहुधा अधिक चांगले प्रशिक्षक आणि फिजिओ यांचा शोध घेतला पाहिजे. शारीरिकदृष्ट्या तुम्ही तंदुरुस्त असलात, तर खेळात सातत्य राखणे तुम्हाला सोपे जाते. सलग दोन किंवा त्याहून स्पर्धा जिंकायच्या असल्यास आपल्या खेळाडूंनी तंदुरुस्तीवर अधिक मेहनत घेणे गरजेचे आहे. पुरुषांत व्हिक्टर ॲक्सेलसन वर्चस्व राखून आहे. पूर्वी महिलांमध्ये कॅरोलिना मरीन अशी कामगिरी करायची. सर्वोच्च स्तरावर खेळताना मानसिकदृष्ट्या सर्वच खेळाडू कणखर असतात. तुम्ही शारीरिक क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यात यश मिळाले, तर तुम्हाला कामगिरी उंचावण्यास मदत होते, असे सायनाने सांगितले.

### लक्ष्यकडून अपेक्षा

गेल्या ऑलिम्पिक स्पर्धेनंतर अपयशाच्या गर्तेत अडकलेल्या लक्ष्य सेनने कामगिरी उंचावताना रविवारी ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद पटकावले. यंदाच्या हंगामातील हे त्याचे पहिले जेतेपद होते. याबद्दल सायनाने त्याचे अभिनंदन केले. स्पर्धा जिंकणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे खेळाडूचा आत्मविश्वास वाढतो. लक्ष्यने ऑस्ट्रेलियन स्पर्धेत चांगला खेळ केला. त्याला सूर गवसला ही त्याच्यासाठी आणि भारतासाठी महत्त्वाची बाब आहे. पुरुष एकेरीत लक्ष्य आपला सर्वोत्तम खेळाडू आहे. त्यामुळे त्याच्याकडून सर्वांनाच खूप अपेक्षा आहेत. आता त्याने कामगिरीत सातत्य राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे,असे सायना म्हणाली.

## इटलीची डेव्हिस चषक विजेतेपदाची हॅट्ट्रिक

**। बोलोन्या (इटली) । वृत्तसंस्था ।**

इटलीने डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा जेतेपद पटकावले. या वेळी प्रमुख खेळाडू यानिक सिन्नेरच्या गैरहजेरीतही इटलीने स्पेनवर २-० अशी सहज मात केली.माटेओ बेरेट्टिनी आणि फ्लावियो कोबोली यांनी आपल्या एकेरीच्या लढती जिंकून स्पेनविरुद्ध २-० अशी निर्णायक आघाडी घेत इटलीचे विजेतेपद निश्चित केले. स्पेनचा संघ २०१९ नंतर प्रथमच स्पर्धेची अंतिम लढत खेळत होता. इटलीचे हे चौथे, तर सलग तिसरे विजेतेपद ठरले. यापूर्वी १९६८ ते ७२ या कालावधीत सलग तीन विजेतेपद मिळविणारा अमेरिका एकमेव देश होता. अमेरिकेने पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे.


## अल नासरचा अल खलीजवर विजय | ४० वर्षीय खेळाडूचा दिमाखदार खेळ

# रोनाल्डोचा बायसिकल किकवर शानदार गोल

**। रियाध । वृत्तसंस्था ।**

पोर्तुगालचा सुपरस्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने सौदी अरेबियातील क्लब अल नासरकडून बायसिकल किकने गोल करत आपल्या प्रगल्भ खेळाची आणखी एकदा उत्तम प्रचिती दिली.

पोर्तुगालच्या या ४० वर्षीय दिग्गज खेळाडूने उजव्या बाजूने आलेल्या क्रॉसला ॲक्रोबॅटिक व्हॉलीने (बायसिकल किकने) गोलजाळीत वळवले. हा फटका इतका जोरदार होता की प्रतिस्पर्धी गोलरक्षकाला तो अडवणेच शक्य नव्हते.



रोनाल्डोच्या या गोलमुळे अल नासरने सौदी प्रो-लीगमध्ये अल खलीजवर ४-१ असा दणदणीत विजय मिळवला.

रोनाल्डो नुकताच पोर्तुगालसाठी आंतरराष्ट्रीय कर्तव्यावरून क्लब संघात परतला आहे. या दरम्यान, आयर्लंडविरुद्धच्या सामन्यात त्याला मैदानाबाहेर पाठवण्यात आले होते. मात्र, त्याच्या गैरहजेरीतही पोर्तुगालने दमदार विजय मिळवत विश्वचषकासाठी पात्रता मिळवली.

आगामी विश्वचषकात खेळल्यास तो विक्रमी सहाव्यांदा हा सन्मान मिळवेल. शिवाय, सातत्याने हुलकावणी देत असलेल्या या जेतेपदावर शिक्कामोर्तब करण्याचा शेवटचा जोरकस प्रयत्नही करेल.

या सामन्यात अल नासरकडून रोनाल्डो व्यतिरिक्त जे फेलिक्स (३९ वे मिनिट), वेस्ले (४२ वे मिनिट) आणि सॅडिओ (७७ वे मिनिट) यांनी गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. अल खलीजकडून अल हवासवीने (४७ वे मिनिट) एकमेव गोल केला. मात्र, शेवटच्या क्षणी रोनाल्डोने केलेला हा चमत्कारिक गोल संपूर्ण सामन्यावर भारी पडला आणि त्याने आपला ७ चा जलवा कायम असल्याचे दाखवून दिले.आपला बहारदार खेळ करीत रोनाल्डोने चाहत्यांच्या डोळ्याची पारणे फेडली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)